ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

एप्रिल २०१२ • मूल्य १० ₹



## आता वाऱ्याने रान कधीही हलणार नाही..
सतीश सोळांकूरकर

## ती 'ग्रेस' स्मरणात राहील...
सुदेश हिंगलासपूरकर

## इति जनुकाख्यानम्
डॉ. उज्ज्वला दळवी




डॉ. प्रकाश दुकळे लिखित 'यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी – डॉ. भारती पाटील, कुलसचिव डॉ. डी.व्ही. मुळे, डॉ. प्रकाश दुकळे, डॉ. सदानंद मोरे, कुलगुरू डॉ. एन.जे. पवार, बी.सी.यु.डी. डायरेक्टर डॉ. अर्जुन राजगे, डॉ. अनिल गवळी, डॉ. बी.एम. हर्डीकर

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**एप्रिल २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक चौथा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

ग्रेस यांचे निधन झाले आणि सारेच त्यांच्याबद्दल मोकळे होऊन बोलू लागले. अंधार-प्रकाशाच्या क्षितिजरेषेवर जगलेला हा कवी अगम्याकडे जात असल्याचा कायम भासला. तो प्रकाशात येऊ इच्छित होता, मात्र तेव्हा स्वकीयांनी त्याला वाळीत टाकलं.

ग्रंथालीच्या वाचकदिनी, दोन वर्षांपूर्वी, त्यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम योजला होता. ग्रेस यांच्या कलाने निमंत्रणपत्रिकेपासून निमंत्रणे पाठवण्यापर्यंत सर्व सोपस्कार पार पाडले, ते ग्रेस यांच्याबद्दल असलेल्या आदरातून. प्रत्यक्षात ती मुलाखत झालीच नाही, ग्रेस सलग दीड-दोन तास बोलले. त्यांच्या शेजारी बसलेले दोन मुलाखतकार श्रोते आणि समोरच्या श्रोत्यांशी संवाद, असा तो कार्यक्रम पार पडला.

नागपूर येथे साहित्य संमेलन झालं त्यावेळी नागपुरात राहणाऱ्या ग्रेसना निमंत्रणही पाठवलं नव्हतं! एवढा मोठा कवी, त्याच गावात असून असं घडलं याची रास्त खंत आणि रोष त्यांनी बोलून दाखवला होता. नागपुरात त्यांच्या ओढीनं आलेल्या मित्रांशी घरीच मैफल रंगवता झाला.

त्यांची ही रूपं अशी अनाकलनीय राहिली. त्यामुळे त्यांचा मनस्वीपणा विक्षिप्तपणा ठरला. त्यांच्या कवितेने त्यात भर घातली. त्यातून समाजभान असलेला हा कवी समाजापासून दूर राहतो असा आभास निर्माण झाला. प्रत्यक्षात व्यक्तिगत पातळीवर त्याचे ऋणानुबंध नवोदितांशीही जुळले. त्यांच्याबद्दलचा धाकयुक्त आदर आता मोकळा झालाय. सारेजण त्या कवीश्रेष्ठाचे अनुभव कथन करू लागले आहेत. आतातरी त्यांच्याबाबत काही आकलन व्हावे.

सतीश सोळांकूरकर आणि सुदेश हिंगलासपूरकर यांचे भिन्न अनुभव त्या दूरस्थाच्या जवळ नेतील.

'एका बीजापोटी' या, अनुवंशशास्त्राची ओळख करून देणाऱ्या, डॉ. उज्ज्वला दळवी यांच्या लेखमालेचा समारोप या अंकात होतोय. 'थिंक महाराष्ट्र'द्वारा, वेगळं काही सांगणारे दोन लेख आणि डॉ. माधवी मेहेंदळे यांचा ललित स्फुट लेख वाचनीय आहे.

**– संपादक**

# आता वाऱ्याने रान कधीही हलणार नाही..

## सतीश सोळांकूरकर

सातवी-आठवीमध्ये असतानाच कवी ग्रेस यांच्या कवितेने भारून टाकले होते. तेव्हा समजायचे काहीच नव्हते, मात्र ती कविता पाठलाग करत असे. त्यांच्या कवितेचे गारूड घेऊनच कदाचित माझ्या कवितेचा प्रवास सुरू होणार असावा. 'पत्रास कारण की'.. नावाचा माझा पहिला कवितासंग्रहावर लिहिताना, ग्रेसच्या प्रभावाखाली असणारा कवी.. अशा मथळ्याने डॉ. अरुणा ढेरे यांनी एक प्रदीर्घ लेख लिहिला. मात्र, त्यावेळेपर्यंत मी ग्रेससरांना प्रत्यक्ष पाहिलेही नव्हते.

'सतीश, ताबडतोब नीघ, ग्रेससरांनी तुला भेटायला बोलावले आहे' असा अनिल कुसूरकरचा फोन आला. मी त्याच्या फोनची वाट पाहतच होतो. ग्रेससर अनिल कुसूरकरच्या घरी दादरला येणार आहेत, हे मला आधी माहीत होते. मला फक्त सरांना एकदा भेटायचे आहे, कसेही कर आणि ते आले की त्यांची परवानगी घेऊन मला कळव, असे मी अनिलला सांगितले होते.

मी तेव्हा घाटकोपरला रहायला होतो. ग्रेससर मला प्रत्यक्ष भेटणार यावर माझा विश्वास बसेना. वेळ संध्याकाळची- ग्रेससरांच्या उदासीशी मिळतीजुळती. कोणत्याही संध्याकाळी पाहा मी उदास असतो.. असे त्यांनीच लिहून ठेवल्याप्रमाणे उदासी आपली शाल पांघरून बसलेली आणि मी आनंदात त्यांना भेटण्याच्या. मी आत गेलो. साक्षात ग्रेस समोर. मी नमस्कारासाठी वाकलो. 'उठा. उठा. नमस्कार करण्याइतका मी मोठा नाही आणि तुम्ही छोटे नाही आहात' असे म्हणून त्यांनी मला जवळ बसवले. 'मी वाचतो कविता तुमच्या. आवडतात मला. भेट व्हायची होती. योग नसावा.' त्यांनी ताण कमी करण्याचा प्रयत्न केला. मी अजूनही थरथरत होतो. 'सर, मलाही, तुमच्या कविता'.. शब्द फुटत नव्हते. कोणाच्या आवडीनिवडीसाठी मी कविता लिहीत नाही. बहुतेक वेळा कविताच मला लिहीत असते. त्यांचे बोलणे सुरू झाले. एखाद्या अनिवार कोसळणाऱ्या धबधब्याप्रमाणे ते बोलत होते. तुकाराम, ज्ञानेश्वर, रिल्के, व्हिन्सेंट व्हॅनगॉग, जीए असे अनेक संदर्भ आणि त्यावरचे त्यांचे भाष्य. जवळजवळ दोन-तीन तास ते बोलत होते आणि आम्ही मंत्रमुध होऊन ऐकत होतो. मग कधी तरी जेवण आले, अनिलने ते हॉटेलमधून खास मागवले होते. त्यांच्यासोबत मी घास घेत होतो. काही समजत नव्हते. जेवतानाही ते अविरत बोलत होते. बाहेर पाऊस पडत होता, तो मुंबईला चिंब करत होता आणि आत ग्रेसांच्या निनादण्याचा पाऊस आम्हाला चिंब करत होता. मग अनिलच्या गाडीतून आम्ही ग्रेससरांना त्यांच्या मुलुंडच्या घरापर्यंत सोडायला गेलो. गाडीतही ते अनेक गोष्टी सांगत होते आणि आम्ही त्यांचा शब्दन् शब्द प्राणामध्ये साठवत होतो. मध्यरात्री केव्हातरी आम्ही सरांना त्यांच्या घरी सोडले. माझा विश्वासच बसत नव्हता, गेले सहा तास मी ग्रेससरांबरोबर होतो! त्याच धुनकीत मी घरी आलो.

सकाळी ग्रेससरांचा फोन आला, 'सतीशजी, मैं कुछ ज्यादा तो नहीं ना बोल गया? कुछ गलती हुई हो तो बंदे को माफ कर देना भाई.' मी म्हणालो, 'सर, असे का बोलता आहात? माझा तर अजूनही विश्वासच बसत नाही, सगळं स्वप्नवत वाटतं आहे.'' तर म्हणाले, ''कलाकार हा स्वप्नातच वावरत असतो आणि तुम्ही तर कवी..''

त्यानंतर ग्रेससरांशी जवळीक होत गेली. स्नेह वाढत गेला. त्यानंतरच्या मुंबईच्या जवळजवळ प्रत्येक भेटीमध्ये आम्ही भेटत गेलो. त्यांनी मला जवळ केले, आपुलकीने आणि मायेने बोलत राहिले, सुखदु:खामध्ये साथ करत राहिले. गेल्या पंधरा वर्षांहून अधिक काळ त्यांच्या स्नेहाचा ओघ मी अनुभवला आहे... आणि आज या सगळ्या स्नेहातून आणि मायेतून स्वत:ला अलगद सोडवून ग्रेस सर पुढे निघून गेले आहेत.

ग्रेससर कोणामध्ये मिसळत नाहीत. कोणाशीही नीट बोलत नाहीत. त्यांच्यासमोर कोणाला जाता येत नाही. ते खूप सिगारेट्स ओढतात, ड्रिंक्स घेतात... अशा अनेक गोष्टी मी ऐकून होतो, पण याबाबतचा माझा अनुभव मात्र पूर्ण वेगळा आहे. या इतक्या वर्षांमध्ये एकदाही मी त्यांना कोणाशी विद्वेषाने, रागाने किंवा मत्सराने वागताना किंवा बोलताना पाहिलेले नाही. उलट त्यांच्यामध्ये असलेल्या जीवनाबद्दलच्या आणि अखिल प्राणिमात्रां- बद्दलच्या कृतज्ञतेचाच अनुभव मला अधिक आला आहे.

कवी ग्रेस यांचा एक कार्यक्रम आपण दादरमध्येच आयोजित करावा, असे एकदा मी आणि अनिल दोघांनी मिळून ठरवले. सर हो म्हणणार नाहीत, उगाच तुम्ही त्या नादाला

लागू नका, असा सल्ला आम्हाला अनेकांनी दिला. पण, तसे काही झाले नाही. ''मी पुढच्या वेळी जेव्हा मुंबईला येईन तेव्हा आपण जरूर रसिक प्रेक्षकांशी गप्पा मारूया. ते जर मला भेटायला, माझ्याशी बोलायला उत्सुक आहेत, तर मी का नाही येणार?'' असे म्हणून सरांनी एका दमात होकार देऊन टाकला. ठरल्याप्रमाणे कार्यक्रम नक्की झाला. दादर सार्वजनिक वाचनालयाच्या हॉलमध्ये कार्यक्रम घ्यायचे ठरले. दिवस होता दिवाळीच्या आधीचा. दादरला खरेदीसाठीची गर्दी आणि प्रत्यक्ष ग्रेस येणार म्हणून दादर सार्वजनिक वाचनालयाच्या हॉलमध्ये तुफान गर्दी. कार्यक्रम संध्याकाळी सहाचा, पण चार वाजल्यापासूनच हॉल भरायला सुरुवात झालेली आणि पाच वाजता लोक जिन्यावर उभे राहून वाट पाहत असलेले. अनिल ग्रेससरांना घेऊन त्याच्या गाडीतून निघाला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कविवर्य शंकर वैद्यसर उपस्थित राहणार होते, ते पोचलेही होते आणि नेमकी अनिलची गाडी ट्रॅफिकमध्ये अडकली होती. सहा वाजले. अजून ग्रेस पोचले नव्हते. मी त्यांच्या सतत संपर्कात होतो, पण ट्रॅफिकमधून रस्ता काढणे मुश्किल होत होते आणि गाडी सोडून येताही येत नव्हते. लोक वाट पाहत होते आणि मी ग्रेसरांचा ललित लेखसंग्रह *मितवा* वाचायला घेतला. त्यातला एकेक ललित निबंध मी वाचत गेलो आणि लोक मंत्रमुग्ध होऊन ऐकत राहिले. सात वाजले, आठ वाजले, 'मितवा' हे अख्खे पुस्तक मी वाचून दाखवले होते आणि साडेआठच्या सुमारास ग्रेससर हॉलमध्ये पोचले. आल्याबरोबर त्यांनी सर्व उपस्थितांची हात जोडून क्षमा मागितली. गेले दोन ते अडीच तास लोक त्यांच्यासाठी थांबले होते आणि त्यानंतर पुढचे दोन तास ग्रेससरांनी आपल्या ओघवत्या शैलीमध्ये रसिकांशी संवाद साधला. दिवाळीची पहिली संध्याकाळ आणि तरीही, आपल्या आवडत्या कवीसाठी वाट पहात असलेली अनिवार गर्दी पाहून आम्ही थक्क झालो होतो. त्या अतोनात गर्दीला शांतपणे थांबवण्याचे काम, ते हॉलवर पोचेपर्यंत त्यांच्याच *मितवा* ने केले होते.

माझ्या *'एकांताचा दिवा'*.. या कवितासंग्रहाचे काम सुरू होते आणि मला त्यासाठी ग्रेससरांच्या शुभेच्छा हव्या होत्या. मी त्यांना नागपूरला फोन केला. ते म्हणाले, 'मी शुभेच्छा दिल्या म्हणून तुमची कविता मोठी होणार नाही आणि नाही दिल्या म्हणून ती छोटीही होणार नाही. One has to stand on his own. तरीही, मी तुमच्यासाठी चार ओळी पाठवतो.' त्यांनी मजकूर लिहिला आणि मला पाठवण्याची व्यवस्था केली. तो मजकूर घेण्याची जबाबदारी मी माझ्या एका नागपूरच्या मित्रावर सोपवली होती. सरांच्या स्नेहाने तो भारावला गेला होता आणि त्यानंतर त्यांचा कायमचा मित्रही झाला होता.

''सारखे ग्रेस, ग्रेस करत असतोस एकदा बोलाव रे घरी त्यांना'' असे आईने मला सांगितले. मी 'हो' म्हणालो, ''ते नक्की येतील बघ.'' आणि मी एका भेटीत त्यांना विचारले, ''सर, माझ्या घरी येणार का एकदा? आईला भेटायचे आहे.'' ते म्हणाले, ''अहो, हे आधी का नाही सांगितले? मी केव्हाही तयार आहे. आईसाहेबांना विचारा, त्यांना कसा वेळ आहे ते. मी मोकळाच असतो तुम्हाला माहीत आहेच.'' ते घरी आले. मला टेन्शन, आई काय बोलेल? बायको काय बोलेल? सर थांबतील का? आईने तर जेवणाचा घाट घातलेला. मात्र सर आले. त्यांनी सर्वांची चौकशी केली. छान बोलले. माझ्या मुलाशी, बायकोशी, आईशी आणि छान गप्पागोष्टी करत, एकेका पदार्थाची तारीफ करत त्यांनी जेवण केले. मध्ये मध्ये माझे कौतुकही केले. त्यावेळी एक वेगळा माणूस मी अनुभवत होतो. समोरच्या माणसापेक्षा आपण कणभरही मोठे नाही, उलट आपण किती लहान आहोत हे दाखवण्याची पद्धत मला माहीत होती. पण, ते माझ्या मुलाच्या कविता ऐकत होते, त्याची चित्रं बघत होते आणि त्याच्याशी गप्पाही मारत होते. एवढा मोठा कवी पण तो कसा या सगळ्यांमध्ये अगदी सहज मिसळून गेला होता.

नागपूरला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित झाले होते तेव्हाची गोष्ट. आमंत्रण असो वा नसो; यावेळी नागपूरला जायचेच आणि ग्रेससरांच्या घरी जायचे असे मी ठरवले होते. या आधी अनेकवेळा ग्रेससरांनी मला त्यांच्या घरी नागपूरला येण्याविषयी सांगितले होते, पण योग येत नव्हता. ग्रेससरांना भेटायला मिळणार म्हणून माझे आणखी काही मित्रही नागपूरला यायला तयार झाले होते आणि गंमत म्हणजे मला निमंत्रितांच्या कविसंमेलनामध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रणही आले. आम्ही तिकिटे आरक्षित केली आणि मी सरांना फोन केला, 'मी नागपूरला तुमच्या घरी येणार आहे.' 'अरे व्वा! कधी?' 'साहित्य संमेलनाच्या निमित्ताने. ग्रेससरांनी दीर्घ श्वास घेतला असे मला वाटले. 'अरे, तुम्ही तेव्हा येणार आहात का? मी तेव्हा मुंबईला असेन.' 'पण, सर, का? काही काम आहे का? काही कार्यक्रम आहे का?' 'नाही तसे काहीच काम नाही पण, तेव्हा मी नागपूरला नसेन हे नक्की.' 'सर, पण, मी माझ्या मित्रांना घेऊन येतो आहे आणि ग्रेससरांची त्यांच्या घरी भेट घालून देतो असे मी त्यांना सांगितलेही आहे आणि त्या एका कारणासाठीच सर्वजण माझ्याबरोबर यायला तयार झाले आहेत. आमची तिकिटेही आली आहेत. सर, प्लीज नाही म्हणू नका ना.' पण, सर ऐकायला तयार नव्हते. मला कारण समजत नव्हते. दोन दिवसांनी मी परत फोन केला. 'सर, भेटाल ना आम्हाला, नागपूरमध्ये?' तेव्हा सर म्हणाले, 'मी भेटलो असतो नक्की, पण साहित्यसंमेलनाच्या तारखा सोडून तुम्ही कधीही या नागपूरला. पाहिजे तर तिकिटाचा खर्चही मी देतो.' 'पण, का सर?' ''सतीशजी, एवढा मोठा मराठी साहित्याचा जागर, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नागपूरला होणार आणि तिथे माझी साधी कोणाला दखलही नसणार, मला सांगा, अशा वेळी मी नागपूरमध्ये राहणं योग्य आहे का? गेली चाळीस वर्षं मी मराठी भाषेमध्ये लिहितो आहे. माझ्या परीनं, चांगले-वाईट जे काही

असेल, पण याचा साधा उल्लेखही होत नाही याचा मला खेद वाटतो. अगदी काल परवा लिहिती झालेली पोरं निमंत्रित म्हणून मिरवणार आणि मला साधं उपस्थित राहण्याचंही आमंत्रण नसणार. हे आताच नाही तर गेल्या अनेक संमेलनांमध्ये झालं आहे आणि म्हणून जिथे संमेलन भरतं तिथून मी हजार किलोमीटर दूर पसार होतो.'' सरांचा मुद्दा योग्य होता. एका तपस्व्याप्रमाणे ते गेली चाळीस वर्षं लिहीत आहेत. त्यांच्या कविता, त्यातल्या प्रतिमा, त्यांचे ललित लेखन, त्यांचे बोलणे त्यांच्या कवितांवर आलेल्या ध्वनिमुद्रिकांनी तर विक्रीचे उच्चांक गाठले, तरीही, साहित्य संमेलनाच्या किंवा पुरस्कारांच्या पंगतीत मात्र त्यांना उपरा ठरवले जात होते. मी त्यांना 'सॉरी' म्हणालो. 'सर, मी नाही तुम्हाला सांगणार नागपूरमध्ये थांबण्यासाठी. मी काढीन माझ्या मित्रांची समजूत' असे म्हणून मी फोन ठेवून दिला.

संमेलनाला निघण्याच्या आधी आठ दिवस त्यांचा फोन आला, ''काय कविराज, नाराज झालात ना आमच्यावर?'' मी म्हणालो, 'नाही सर.' ''अरे, या या नागपूरला. तुम्ही सगळे येणार आणि मी घरी थांबणार नाही असं कधी होईल का? सर्वजण या. माझ्या घरी या. आपण गप्पा मारुया. भाड में गया साला संमेलन.' केवळ आमच्यासाठी त्यांनी नागपूरला थांबणे स्वीकारले होते. ते फक्त थांबलेच असे नाही, तर आम्ही घरी गेल्यावर आमची अतिशय उत्तम प्रकारे व्यवस्था केली. माझ्या मित्रांनी फोटो काढायचे आहेत सर असे म्हटल्यावर त्यांनी छान फोटो काढू दिले आणि अगदी मनसोक्त गप्पा मारल्या. निघताना माझ्या डोळ्यांत पाणी होते. सर केवळ आमच्यासाठी थांबले होते आणि कोणताही बडेजावपणा न धरता माझ्या सर्व मित्रांची त्यांनी आपुलकीने ऊठबस केली होती. त्यांनी म्हटल्याप्रमाणेच त्या संमेलनामध्ये मात्र त्यांचा उल्लेख झाला नाही. एक सुशीलकुमार शिंदे सोडले, तर कोणीही त्यांच्या नावाचा उल्लेखही केल्याचे मला स्मरत नाही.

माझ्या *सावी*.. या ललित लेख–संग्रहाच्या प्रकाशनाला ते येऊ शकले नाहीत. पण, कार्यक्रम सुरू असताना त्यांचा फोन आला आणि फोनवरून त्यांनी शुभेच्छा दिल्या. 'मी तिथेच आहे. माझ्या शुभेच्छा!' असे म्हणून, मी ग्रेस तुम्हाला नागपूरवरून शुभेच्छा देतो आहे असे जाहीर सांगावे असे त्यांनी मला फोनवरून सांगितले. माझ्या या ललित लेखसंग्रहातील, फकीर हा ललितबंध वाचल्यावर, यातला तुमचा फकीर माझ्या माहितीचा आहे आणि त्याला मी प्रत्यक्ष पाहिलेला आहे असे ते मला म्हणाले होते.

अगदी अलीकडची गोष्ट सांगायची झाली तर, वाशिमवरून, 'काव्याग्रह' नावाचा कवितेला वाहिलेला एक अंक निघतो. विष्णू जोशी हे त्याचे संपादक आहेत. या अंकामध्ये माझ्या कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. तो अंक ग्रेससरांकडे गेला आणि त्या कविता वाचून त्यांनी लगेच मला फोन करून त्या कविता आवडल्याचे सांगितले. इतकेच नव्हे, तर विष्णू जोशी यांनाही फोन केला आणि अंकाचे कौतुक केले आणि काव्याग्रहमध्ये लिहिणे आवडेल असेही सांगितले. या वेळच्या मौज, दीपावली, रुची, हंस इत्यादीमधील माझ्या कविता त्यांनी वाचल्या आणि त्या त्या वेळेला मला फोन केला. एक वेगळा सूर, कविराज, तुम्हाला सापडला आहे, तुमची काळजीही वाटते आणि तुमचे कौतुकही करावेसे वाटते. तुमचा येणारा नवीन कवितासंग्रह वाचण्यासाठी मी उत्सुक आहे, असेही ते म्हणाले होते.

त्यांना कॅन्सर झाल्याचे जेव्हा मला समजले तेव्हा मी त्यांना फोन केला. माझा उदासीचा सूर ऐकून ते म्हणाले, ''अरे cancer is my elder brother. तुम्ही काळजी करू नका. मला काहीही होणार नाही. जेव्हा जायचे तेव्हा मी माझ्या मर्जीनं जाईन. देवाचं काही काम करण्यासाठी त्याने माझी नेमणूक केली आहे आणि आता तोच माझी परीक्षा पाहतो आहे.'' या दुर्धर रोगावर त्यांनी विलक्षण जिद्दीने मात केली. या काळातही त्यांचे नित्यक्रम, त्यांचे पोहणे आणि लेखन अव्याहत सुरू होते. इतर काही कोठे वाचले तर आवर्जून सांगणे आणि कळत नकळत माझ्या शब्दांवर बसलेली धूळ पुसून काढण्याचे काम ते लीलया करत होते. एकदाही आपल्या त्रासाबद्दल ते माझ्याशी किंवा इतर कोणाशी बोलल्याचे मला स्मरत नाही. 'देवा, काळजी घ्या स्वत:ची', हे मात्र त्यांचे माझ्यासाठीचे सततचे वाक्य.

माझ्या पत्नीच्या गर्भाशयामध्ये एक गाठ आहे असे जेव्हा मला समजले, तेव्हा आम्ही सर्वजण खूपच घाबरून गेलो होतो. ही गोष्ट जेव्हा ग्रेससरांना समजली, तेव्हा त्यांनी मला फोन केला, 'देवा, काळजी करू नका. या वयामध्ये असा त्रास होतो बाईमाणसाला. काहीही होणार नाही. देव आहे तुमच्यासोबत', असे म्हणून ते मला धीर देत राहिले. स्वत: कॅन्सरशी झुंज देत असताना ते माझी समजूत काढत राहिले. ऑपरेशनच्या दिवशी माझ्या पत्नीला ऑपरेशन थिएटरमध्ये नेतानाच त्यांचा मोबाइलवर फोन आला. कविराज, तुमच्या पत्नीकडे द्या फोन जरा. ते तिच्याशी बोलले आणि मग माझ्याशी बोलत राहिले. ऑपरेशन यशस्वी झाल्याबद्दल मी त्यांना फोन केला; तर म्हणाले, 'मला माहीत होते कविराज.' ऑपरेशन होऊन ती पूर्णपणे शुद्धीवर येईपर्यंत त्यांचा फोन सतत येत राहिला होता.

त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका माझ्याजवळ आहे. ते आयोजकांना आधी त्यांची अशी एक mailing list देतात. ती पत्रिका वेळेत मिळाली की नाही, याची चौकशी करतात. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाची पत्रिका ही अगदी त्यांच्या फोटोपासून ते मजकुरापर्यंत प्रतिभाशाली असते.

त्यांना दुसऱ्यांदा कॅन्सरने पकडले. पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये ते उपचार घेत आहेत असे समजल्यावरून मी त्यांना भेटायला गेलो. तिथेही त्यांची तीच पद्धत. आपल्याला भेटायला येणाऱ्या प्रत्येकाची काळजी. त्याला खायला–प्यायला देणे. त्याची आणि त्याच्या घरच्यांची

चौकशी करणे आणि शक्यतो आपल्याबद्दल न बोलणे. मी म्हणालो, 'सर, कॅन्सर परत आला आपल्याकडे.' तर म्हणाले, 'उसे समझनेवाला शरीर और दूसरा कहां मिलेगा ? यह मेरे लिए भगवान का प्रसाद है और इसे मैं सर आँखों पर बिठाना चाहता हूं.'

पुण्याला त्यांना भेटण्याच्या निमित्ताने अनेक वेळा जाणे झाले. त्यांच्याशी गप्पा मारताना अनेक संदर्भ येत गेले. आयुष्यभर मराठी भाषा आणि मराठी लेखनावर प्रेम करणारा आणि आपल्या अंतर्यामी ऊर्मीने लिहिता राहणारा हा कवी, मराठी साहित्याच्या दरबारात मात्र पोचू शकला नाही. किंबहुना त्यांना ते दरवाजे जाणीवपूर्वक बंद करण्यात आले असे म्हणणेच योग्य वाटते आता. ''मी कोणाच्या मरणाला आणि तोरणालाही जात नाही, माझी एकतारी मी घेऊन बसतो एकांतात, गर्द अंधारात. ती माझ्यापुरती वाजवतो आणि डावा हात उशाला घेऊन एकटाच झोपून जातो. कोणाकोणाची, साधी पाखरांचीही झोपमोड होऊन नये म्हणून मी भल्या पहाटे पोहायला जातो आणि जग उठण्याच्या आत माझ्या राहुटीत येऊन बसतो. तरीही, लोकांना माझा त्रास का आणि कशासाठी होतो, हे समजत नाही कविराज! मी कधीही कोणाकडे काही मागितले नाही, हात पसरला नाही पण, तरीही माझे हात कलम करण्याच्या गोष्टी कानांवर येतात आणि दुखवून जातात कविराज!'' ही त्यांची व्यथा व्याकुळ करणारी होती.

अगदी अलीकडे म्हणजे एक महिन्यापूर्वी मी त्यांना भेटायला गेलो तर त्यांचा सूर वेगळाच वाटला. थकल्यासारखा, उदासीचा. कोण कोण आले होते भेटायला, असे मी सहज विचारले तर स्तब्ध झाले. शून्यात बघत राहिले. 'मी कणाकणाने कसा मरतो आहे हे पाहण्यासाठी येतात सगळे आता, त्यांना माझ्या तब्येतीची काळजी नसते. त्यांनी ग्रेसला जिद्दीनं जगताना पाहिलं आहे, आता त्यांना ग्रेसला हळूहळू मरताना पाहायचा आनंद घ्यायचा आहे.'' असे एका दमात बोलून ते स्तब्ध झाले. मग बराच वेळ काही बोलले नाहीत.

अशा अनेक आठवणी आणि प्रत्येक वेळी एका वेगळ्या तेजाने उजळून जाणारे ग्रेससर आणि त्यांची कविता, त्यांचे ललित लेखन हे मी जवळून पाहिले आहे. सालस, सुसंस्कृत, मित्रांसाठी आणि तथाकथित शत्रूंसाठीही अंतर्बाह्य जिव्हाळा. कोणाबद्दल आकस नाही. मिळाले म्हणून अतिआनंद नाही किंवा न मिळाले काही म्हणून खेद नाही, अशी संत वृत्ती. मध्यंतरी त्यांची कविता आपली म्हणून कोणीतरी छापली, शब्द आणि शब्द जसाच्या तसा. तर म्हणाले, ''असो! त्या निमित्ताने दुसऱ्याच्या नावाने का होईना, माझी कविता छापून आली. ज्यांना ग्रेस माहीत आहे त्याला त्याची कविता माहीत आहे. खाली नाव बदलले म्हणून ग्रेसची कविता बदलता येणार नाही ना, कविराज?''

असा हा चैतन्यमयी, परमेश्वराप्रती आणि सकल चराचराप्रती कृतज्ञ असलेला अवलिया कवी – ग्रेस.

माझा एक संगीतकार, गायक मित्र आहे, किशोर कुलकर्णी नावाचा. दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये मी ग्रेससरांना भेटायला जाणार हे त्याला माहीत होते. तो सरांना भेटायला उत्सुक होता. संध्याकाळी, मी निरोप घेता-घेता, सरांची परवानगी घेऊन तो दबकत दबकत आला. सरांनी त्याच्याशी गप्पा मारल्या. 'सर, मी आपल्या एका गाण्याला चाल बांधली आहे, ऐकवण्याची इच्छा आहे. ऐकवू का?' असे त्याने विचारले. हॉस्पिटलच्या त्या वॉर्डमध्ये त्याला गाणे ऐकवायचे होते. सर म्हणाले, 'अरे, नेकी और... अरे, ऐकवा दोस्त.' त्याने स्वत: स्वरबद्ध केलेली सरांची एक कविता ऐकवली. सरांनी ती शांतपणे ऐकली आणि त्याला काही सूचनाही केल्या आणि त्याचे कौतुकही केले. थोड्या वेळाने आम्ही सरांचा निरोप घेतला. दहा मिनिटांनंतर सरांचा माझ्या मोबाइलवर फोन आला. 'कविराज, तुमच्या मित्रानं चाल चांगली बांधली आहे. आहेत का ते सोबत तुमच्या आता?' मी 'हो' असे म्हणताच, 'जरा त्यांच्याकडे फोन द्या' असे म्हणाले. मी किशोरकडे फोन दिला. सर बोलत होते आणि किशोरच्या डोळ्यांतून पाणी गळत होते. त्याला हुंदका आवरत नव्हता. मला नेमके काय झाले ते समजेना, पण मध्ये थांबवातही येईना. Thank you sir असे म्हणून किशोरने फोन माझ्याकडे दिला. 'काय झालं रे किशोर?' तो जरा सावध झाल्यावर मी त्याला विचारले. 'अरे, काय सांगू सतीश तुला? ग्रेस हा माणूस नाही, हा तर देव आहे बाबा.' 'अरे, पण काय बोलले ते' असे म्हणताच तो म्हणाला, 'सर, माझी क्षमा मागत होते.' 'क्षमा? कशाबद्दल?' किशोर म्हणाला, 'ते काय म्हणाले ते ऐक, किशोरजी, आपण खूप सुंदर गाणे ऐकवले आणि माझी संध्याकाळ सोनेरी झाली. पण, मला क्षमा करा. मी तुमच्या त्या निघण्याच्या घाईमध्ये तुम्हाला साधा चहाही विचारू शकलो नाही. आता मात्र परतच्या खेपेला तुम्ही यायचे आणि माझ्याबरोबर एक कप चहा प्यायचा. ओके?' सर हॉस्पिटलमध्ये असतानाही त्यांनी रीत सोडली नव्हती. त्यांच्याकडे येणारा प्रत्येक माणूस हा योग्य तो पाहुणचार घेऊनच परतला पाहिजे असा त्यांचा खाक्या. ते हॉस्पिटलमध्ये, कॅन्सरच्या रोगाला कुरवाळतानाही तो जपत होते. मला नेहमी प्रश्न पडतो, की इतका सघन आणि जिव्हाळा जपणारा हा माणूस, ग्रेस, त्याच्याबद्दल इतके, नको नको ते प्रवाद कोणी आणि का पसरवत असेल?

अशा अनेक आठवणी आहेत, ज्यामध्ये मला सतत त्यांच्यातला माणूस-पणाचा झरा दिसला आहे. अनेक लोकांना त्यांनी मदत केली त्याचा ते कुठेही उल्लेख येऊ देत नाहीत. यातलेच कितीतरी नंतर त्यांच्यावर उलटले, त्यांच्याबद्दल भलेबुरे लिहिते झाले, हे मी पाहिले आहे. पण, ग्रेससरांनी आपला वसा सोडला नाही. मी एकदा त्यांना विचारले, 'सर, हे सगळे कसे जमते तुम्हाला?' सर म्हणाले, 'कविराज, मित्र असो वा शत्रू आपण एक सजवलेला हत्ती आणि अंबारी तयार ठेवायची आणि त्याला सन्मानानं देऊन टाकायची, बस्स!' आपल्या

भाषणाची सुरुवातही ते ‘माझ्या प्रिय मित्रांनो आणि अतिप्रिय शत्रूंनो’ अशी करताना मी त्यांना अनेक वेळा पाहिले आहे.

ग्रेससरांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आणि त्यावर अनेक प्रतिक्रिया आल्या. सरांनी त्यावर अचूक भाष्य केले होते. सोनारानेच कान टोचावे लागतात, कविराज.. इथेही त्यांच्या कवितेला बाजूला ठेवून, ललितलेखनासाठी हा पुरस्कार त्यांना मिळाला. माझ्या कोणत्याही लेखनातून कविता ही बाजूला काढताच येत नाही असे ते म्हणाले होते.

ग्रेससरांबद्दल लिहिताना हे असे आठवणींचे अनेक दिवे लागत जातात आणि आपण परत परत उजळत जातो.

सर असताना त्यांच्याबद्दल ज्यांच्या लेखणीने मौनव्रत घेतले होते त्या सगळ्या लेखण्या आता रकानेच्या रकाने लिहिण्यासाठी सरसावलेल्या दिसताहेत. एक समजत नाही मला, सर जर इतके प्रतिभावंत होते, थोर साहित्यिक होते तर ते हयात असताना त्यांच्याबद्दल एकही अक्षर चांगले का बोलले गेले नसावे? मानसन्मान, पुरस्कार यांपासून त्यांना दूर का ठेवले गेले असावे? आणि ते जर त्या योग्यतेचेच नव्हते तर, आता ते गेल्यावर इतके भरभरून का लिहिले जात असावे?


आज सर नाहीत आणि अनेकांना छान कंठ फुटले आहेत. जणू चढाओढच लागली आहे, मी त्यांच्या कसा अगदी जवळ होतो हे सांगण्याची. गेले दोन-तीन दिवस वर्तमानपत्रांमधून जे काही छापून येते आहे आणि टीव्हीच्या वाहिन्यांवरून दाखवले जाते आहे, ते पाहून मात्र वेदना होतात. ग्रेससर इतके आजारी असताना, इतके दिवस पुण्यामध्ये असतानाही जे कोणी साधी त्यांची विचारपूस करायलाही गेले नव्हते. आज मात्र त्यांच्याबद्दल भरभरून बोलताहेत, लिहिताहेत. सरांच्या या सर्व अतिजवळच्या प्रियजनांना एवढेच सांगावे असे वाटते, की लिहा, खूप लिहा. बोला त्यांच्याबद्दल आणि मिरवून घ्या पण, सावध असा. ते तुमच्यातून पूर्णपणे निघून गेल्याची खात्री करून घ्या. तो देवाघरचा माणूस होता, तो असताना त्याने तुम्हाला कधी स्वत:चा थांगपत्ता लागू दिला नव्हता. आता तो गेला आहे म्हणजे परत येणारच नाही, असे काही म्हणता येणार नाही. तो कुठेही, कोणत्याही रूपात अचानकसा परत येऊ शकतो आणि मी *महाकवी दु:खाचा* असे म्हणत तुमच्या खांद्यावर हात ठेवू शकतो.

असो. सर गेले ही एकमेव गोष्ट आता पेलवता येणार नाही आणि *आता वाऱ्याने कधीही रान हलणार नाही.*

त्यांच्या कवितेबद्दल त्यांनी *मितवा*मध्ये एक अवतरण दिले आहे :

*Yes! Yes! Poetry is conspiracy, but it is not against anyone; nor against you, neither against life* - कविता हा कवीच्या हत्येचा कट आहे. कवितेने या कटाचा चुकूनही जर कवीला सुगावा लागू दिला तर तो निर्मितचक्रातून निसटून जीवनचक्रात अडकून पडतो आणि मग स्वत:च्या हत्येसाठी जे दान कटकर्त्या कवितेला द्यावे लागते, ते दान तो देऊ शकणार नाही. ती आपले प्रारूप तेवढेच कवीला देईल मग, त्याखाली दडलेल्या परमाणूंचे स्पष्टीकरण देणार नाही. And, then, he has to live on this earth like a discarded angel...

**– सतीश सोळांकूरकर**
श्री सह्याद्री को-ऑप-हौ-सोसायटी
बि.न.९, फ्लॅट नं. ६
कळवा (पश्चिम)
जि. ठाणे-४०० ६०५
०२२-२५४०३७७८/०९३२४३६३९३४
satishsolankurkar@gmail.com




# ओळखीची वाट

**नीला सत्यनारायण**

पूर्वीपेक्षा आताची स्त्री अधिक सुशिक्षित, अधिक प्रगत, अधिक मोकळी आहे खरी, पण अजूनही ती स्त्रीपणातून पूर्णपणे मुक्त होऊन माणूसपणात आलेली नाही. अजून तिचं वस्त्रहरण थांबलेलं नाही, अजून तिचं अग्निदिव्य संपलेलं नाही. अशा या अनुभवांच्या ओळखीच्या पण अनोळखी वाटा.

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**


# ती 'ग्रेस' स्मरणात राहील...

## सुदेश हिंगलासपूरकर

२६ मार्च २०१२, सकाळी सव्वादहा वाजता मला पद्मभूषण देशपांडे याचा मेसेज आला, की 'ग्रेस' गेले. तेव्हा मी प्रवासात होतो. मी तो वाचला व प्रवास करत राहिलो. लगेच वीस मिनिटांनी शिरीष वीरकर यांचाही ग्रेस गेल्याचा फोन आला. मी म्हटले, हो, मला भूषणचा मेसेज आला होता. त्यानंतर मी ग्रंथालीच्या माटुंगा ऑफिसमध्ये गेलो. तेथे अरुण जोशी याच्याशी 'ग्रेस'बद्दल बोललो व ग्रँटरोड ऑफिसला निघालो. तेथे विनायक गोखले यांनी ग्रेस गेल्याचे आणि त्याबद्दल एका चॅनेलवर प्रवीण बर्दापूरकर त्यांच्याबद्दल बोलताना ऐकल्याचे सांगितले. हे सर्व ऐकूनही मी दिवसभराच्या कामांत गुंतलो होतो. रात्री मी घरी पोचलो व जेवण उरकून टीव्ही लावला तर 'झी' चॅनेलवर अशोक बागवे, चंद्रकांत काळे, श्रीपाद जोशी, अरुण म्हात्रे हे ग्रेसच्या कविता, व्यक्ती म्हणून त्यांच्याशी आलेला संबंध ह्याविषयी बोलत होते. हे सर्व ऐकताना माझ्या मनात मात्र आठवणी आणि ग्रेस घोळत होते. मला काही केल्या झोप लागेना. अस्वस्थ वाटत होते. माझी मुलगी सई विचारत होती, बाबा, तू काय विचार करतोस? लिहितोस काय? मी तिला म्हटले, मी आज लिहिणार आहे. मध्येच उठलो व लिहायला घेतले.

दोन वर्षांपूर्वी, ठाण्यात साहित्य संमेलन झाले व त्या संमेलनाच्या आदल्या दिवशी ठाण्यात ग्रंथालीचा वाचकदिन साजरा करायचे ठरले होते. या संदर्भात शिरीष वीरकरांच्या ऑफिसमध्ये आमची बैठकही झाली व सर्वानुमते वाचकदिनाला 'ग्रेस' यांना बोलवायचे ठरवले. प्रश्न होता, बोलावणार कोण? वीरकरांनी ती जबाबदारी घेतली आणि प्रल्हाद जाधव यांच्या मदतीने ग्रेस यांच्याशी कार्यक्रमाचे निश्चित केले. ग्रेस कार्यक्रमाला येणार, असा त्यांनी फोन करून मला निरोप दिला. मला ग्रेस यांच्याशी बोलून घ्यायला सांगितले. त्यांचा प्रवास, कार्यक्रमपत्रिका व राहणे याबद्दल नीट त्यांना विचारून घ्यायला सुचवले. खरे तर हे सगळे त्यांनीच ठरवून, मला कार्यक्रम घडवण्यास सांगणे अपेक्षित होते. परंतु सारी जबाबदारी माझ्याकडे आली.

मी ग्रेस यांच्याशी बोललो, पत्र दिले व पुढे त्यांचा व माझा संवाद सुरू झाला. कार्यक्रमपत्रिका कशी असावी, ती कोणाकोणाला पाठवायची, याबाबत आपल्या मताशी ते आग्रही असतात. तसे न घडल्यास किंवा त्यांना काही खटकल्यास ते येणारही नाहीत असे ऐकून असल्याने मनात एकप्रकारची भीती होती. परंतु ह्या सर्व जबाबदारीत माझा मित्र, ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर याने स्वतः लक्ष घातले. त्याने नागपूरलाच विवेक रानडे यांच्याशी बोलून, कार्यक्रमपत्रिका डिझाइन करून-छापून, ग्रेस यांची पसंती घेऊन मुंबईस रवाना केली. मला पत्रिका मिळताच ग्रेस यांनी मला त्यांच्या संपर्कातल्या सहकाऱ्यांचे पत्ते व फोन नंबर दिले. आणि मग सुरू झाला त्यांच्या-माझ्या फोनचा सिलसिला. त्यांच्या भाषेत अनुसंधान! ते होते, मी सांगितलेल्या माणसांना पत्रिका पोचल्यात ना, तू त्यांच्याशी फोनवर बोललास ना किंवा कार्यक्रम कसा होणार वगैरे. एकदा, त्यांच्याशी



वाचकदिनी ग्रेस आणि सुदेश

बोलताना, मी त्यांच्या कविता वाचलेल्या नाहीत, आणि मला कविता फारशा कळत नाहीत असे सांगितले. बहुधा माझे हे सांगणे त्यांना प्रामाणिक वाटले आणि भावले. आता ते माझ्याशी दररोज बोलू लागले. त्याच संवादात ते माझ्या घरातील व्यक्तींबद्दल किंवा ग्रंथालीच्या कामाबद्दलही बोलत.

कार्यक्रमासाठी ग्रेस २४ डिसेंबरच्या सकाळी मुंबईत येणार होते. तोपर्यंत माझ्या मनात, त्यांची आणण्याची व राहण्याची व्यवस्था व कार्यक्रम नीट घडेल ना, याबद्दल धाकधुक होतीच. मी २३ डिसेंबर २०११च्या संध्याकाळी प्रवीण बर्दापूरकर याला, ग्रेस यांना नागपूर एअरपोर्टवर सोडशील ना, असा फोन केला. माझ्या काळजीची त्याला कल्पना आली, तो म्हणाला, 'सुदेश, तू निर्धास्त राहा!'

मुंबईत मी त्यांच्यासाठी विलेपार्ले येथे राहण्याची सोय केली. आम्ही त्यांना राहण्याच्या ठिकाणी घेऊन आलो.

हॉटेलमध्ये चहा येण्यास झालेल्या उशिराने ते अस्वस्थ झाल्याचे मला जाणवले. तेथे आमच्या गप्पा झाल्या. त्यांना भेटण्यास ठाण्याहून अविनाश बर्वेही आले होते. ते त्यांना ठाणे येथील कार्यक्रमच्या ठिकाणी घेऊन येणार होते व पुन्हा पार्ले येथील मुक्कामी सोडणार होते.

गप्पांच्या ओघात मी ग्रेसना घाबरतच विचारले, 'आपला कार्यक्रम ठाण्यास आहे आणि आपला मुक्काम पार्ला येथे असणार आहे. मात्र अविनाश बर्वे गाडी घेऊन आले आहेत. आपणास त्यांच्या खोणी येथील संस्थेस भेट द्यायला व येऊर येथील मित्राच्या बंगल्यावर राहायला आवडेल का?' 'आपने फर्माया तो जरूर चलेगा!' असे म्हणत त्यांनी होकार दिला.

२४ डिसेंबर २०११ रोजी संध्याकाळचा त्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम उत्तम पार पडला. खरे तर ती मुलाखत नसून ते स्वतःच पूर्णवेळ उत्स्फूर्त बोलले. कार्यक्रम संपला. त्यानंतर आमच्या सहकाऱ्यांपैकी एका व्यक्तीने त्यांच्याशी जे काही बोलणे केले, त्याने ते खूप डिस्टर्ब झाले. त्यांना तो प्रकार आवडला नाही. दर दोन मिनिटांनी ते तो मुद्दा मांडत राहिले. या अनपेक्षित प्रकाराने मी गोंधळलो. तेव्हा समजले, की त्यांना अशा प्रकाराने डिप्रेशन येते. काही काळ मग ते अस्वस्थ राहतात. माझी व अरुणची अवस्था कठीण झाली. अविनाश बर्वे यांनी त्यांची समजूत घातली आणि येऊर मुक्कामी घेऊन गेले. दुसऱ्या दिवशी अविनाश बर्वे यांनीच त्यांना एअरपोर्टवर नेण्याची जबाबदारी घेतली होती. ग्रेस यांचे नागपूर येथे प्रयाण झाले. त्यांनी मला सुखरूप पोचल्याचा फोन केला आणि संवाद संपला.

पाच-सहा दिवस गेले. मी, कार्यक्रमाचे काढलेले फोटो, त्यांचे निमंत्रण, मुलाखत हे सर्व आठवत होतो. अरुण जोशी याला मी म्हटले, मला ग्रेस यांना पत्र पाठवायचे आहे. कार्यक्रमाची सीडी द्यायची आहे. तू मला त्यांच्या निमंत्रणाप्रमाणेच त्या स्टाइलचे पत्र लिहून दे. त्याने मला पत्र लिहून दिले. ते पाठवण्याबाबत मनात चलबिचल होत होती. कारण अशा प्रकारे लिहिणे मला जमले नसते. मी त्यांना ते पाठवले.त्यांना ते पत्र खूपच आवडले होते. त्यांनी ते चक्क फ्रेम करून ठेवणार असल्याचे सांगितले! ते पत्र असे –

१८ जानेवारी २०११

आदरणीय ग्रेस
सस्नेह नमस्कार

आपल्याशी फोनवर पहिले अनुसंधान झाले ते हृदयसंधान कसे झाले कळले नाही. प्रत्येक अवघडल्या जागी दुखणे नसते. आपल्याला आनंद शोधताना त्रास होतो हे मूळ असते. आपण 'ग्रंथाली'च्या वाचकदिनात पूर्णवेळ सहभागी झालात ते 'लक्ष'णीय होते. म्हणूनच चिरकाल स्मरणात राहणारे आहे. आपल्या वाणीचा थेट आविष्कार माझ्या आकलनापलीकडचा असला तरी त्यातला खरेपणा जाणण्याइतके भान माझ्यात आहे. आपला फोन प्रत्येक वेळी म्हणूनच आपल्या सच्चेपणात गुंतवत होता. हे सहज गुंतणे हाती नसते. अन्यथा आपणच निर्माण केलेला गुंता सोडवत बसणाऱ्यांना सरळसाधेही गुंतागुंतीचे वाटते. दोन मुकेही नजरेने बोलू शकतात, मग शब्दांचा भाव प्रकट करणाऱ्या भाषेने गोंधळ का व्हावा, हे उमगत नाही. (जो जे वांछिल तो ते लाहो, दुसरे काय!) कुठल्या साच्यात आपण जगतो, कुठल्या मुशीत घडतो, यापेक्षा विचारांना कुंपण न घालता जगणे सर्वकाही स्वीकारू शकते, पण हा जन्ममरणाच्या मधला काळ या कुंपणांमध्येच सरतो.

आपल्या बोलण्यातून हेच अनपेक्षित गवसल्याचे समाधान आहे.

कळावे.
आपला
सुदेश हिंगलासपूरकर

ता. क. सोबत 'रुची'चा अंक, २४ डिसेंबरच्या वाचकदिनाच्या कार्यक्रमाची सीडी पाठवत आहोत.

पुन्हा नव्याने आमचा संवाद सुरू झाला. वाचकदिनाचा कार्यक्रम घडवत असताना माझ्या लग्नाचा आलेला वाढदिवस, त्यावेळी त्यांनी माझ्या बायकोशी केलेला संवाद होताच व नंतरही माझ्या व माझ्या बायकोच्या वाढदिवशी आलेला फोन व शुभेच्छा, तसेच नागपूर येथे घरी येण्याचे दिलेले आमंत्रण, असा पाच-सहा महिने आमचा फोनसंपर्क चालू राहिला. यात कविता केव्हाही नव्हती.

जुलै महिन्यात मी, अरुण व सुधाकर राऊत असे आनंदवन, सोमनाथ व हेमलकसा येथील भेटीसाठी गेलो होतो. परतीच्या प्रवासात मी एकटाच नागपूर मुक्कामी प्रवीण बर्दापूरकर याच्या घरी गेलो होतो. मी त्याला ग्रेस यांनी मला घरी बोलावले आहे असे सांगितले. तो म्हणाला, 'सुदेश, तुला त्यांनी बोलावले आहे. त्यामुळे मी तुला त्यांच्या घरी सोडतो' असे म्हणून प्रवीणने मला त्यांच्या घराशी सोडले. अनेक वर्षांची मैत्री असलेल्या प्रवीणलाही त्यांचा मनस्वीपणाचा आदरयुक्त धाक कसा होता त्यातून हे अनुभवाला आले. मी दुपारी दीड ते साडेचार ग्रेस यांच्या घरी होतो. गप्पा, खाणे, फोटो बघणे, त्यांची निमंत्रणे पाहणे असे चालू होते. फोटो दाखवताना त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यातले काही हळुवार प्रसंग ते मोकळेपणाने सांगत होते, असे, की आमची गाढ मैत्री असावी व मित्राशी सुखदुःखाच्या गोष्टी शेअर कराव्या. मी तिथून बाहेर पडलो, तो मनाने प्रांजळ ग्रेस पाहून. निघताना ते मला म्हणाले, 'तू पुन्हा नागपूरला येशील तेव्हा तुम्ही सर्वजण माझ्या घरी उतरा. मला तुझ्याबरोबर आनंदवन, हेमलकसा येथे येण्यास आवडेल. माझा गोव्यात कार्यक्रम आहे. आता तू माझ्या मित्रांच्या यादीत सामील झाला आहेस. मी तुला कार्यक्रमाची पत्रिका पाठवीन. तुला कार्यक्रमास यायचे आहे.' त्याप्रमाणे त्यांनी मला कार्यक्रमाची पत्रिका पाठवली. या कार्यक्रमास जाण्याचा योग आला नाही. मात्र त्यांचा-माझा फोनवरून संवाद चालूच राहिला.

आनंदवन आणि हेमलकसाला ते माझ्यासोबत येणार या कल्पनेनेच मला भरून आले. अविनाश बर्वे यांच्या खोणी येथील मंतिमंदांच्या संस्थेला, ग्रेस यांनी आवर्जून भेट दिली होती. इतकेच नाही, त्यांनी संस्थेला मदत म्हणून काही रकमेचा चेकही पाठवला, असे बर्वे यांनी मला सांगितले होते. विक्षिप्त आणि समाजाशी फटकून असल्याच्या त्यांच्या प्रतिमेला छेद देणारी त्यांची सामाजिक कामाबाबतची आस्था मनावर ठसून राहिली.

पुढील वर्षीच्या वाचकदिनानिमित्त, आम्ही काही मित्र संगमनेर येथे गेलो होतो व येताना पुणेमार्गे दीनानाथ हॉस्पिटलमध्ये त्यांना भेटायला गेलो होतो. त्यावेळी त्यांच्याशी झालेल्या एक तासाच्या गप्पांत, त्यांनी महात्मा गांधी व आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या विवेचनाने मी, अरुण जोशी, पद्मभूषण देशपांडे, अरुण शेवते भारावून गेलो होतो. त्यांच्या विचारांची खोली जाणवलीच. शिवाय त्यांची जीवनविषयक दृष्टी खुलेपणाची वाटली. इतकं वैचारिक त्यानं माझ्याशी बोलावं, याचं मला नवल वाटलं. तेव्हा हेही जाणवलं, की आमच्यात जमलेल्या हृदयसंवादावरचा तो विश्वास होता. त्यांना याविषया-संबंधात, पुन्हा एकदा ग्रंथालीत कार्यक्रमासाठी बोलवावे, असे आखलेही होते. परंतु नियतीच्या मनात ते नव्हते. तो योग आला नाही. ग्रेस काळाच्या पडद्याआड निघून गेले.

दुर्बोध मानल्या गेलेल्या या कवी-तत्त्वज्ञ व्यक्तीशी माझा इतका सहज संवाद होईल असे कधी वाटले नाही. ते फटकून वागतात असा प्रत्यय आला नाही. त्यांच्या अनुसंधानाला मी हृदयसंधान म्हटलेले त्यांना आवडले होते. त्यातून घडलेल्या भेटींत त्यांची मी पाहिलेली रूपे मनोहारी होती. प्रत्येक रूपात प्रामाणिकता होती, बेगडीपण नव्हते. त्या वागण्यात असलेली 'ग्रेस' सदैव स्मरणात राहील.

**– सुदेश हिंगलासपूरकर**
बी २, गंगा, ग्रीन व्ह्यू कॉम्प्लेक्स,
बोरीवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६
भ्रमणध्वनी : ९८६९३९८९३४

## लक्ष्मीचा प्रभाव व अभिजात कलावंत

'चित्रपट जनकाचा कुटुंबपट' (प्रभाकर भिडे, रुची मार्च २०१२ आणि 'बोलक्या रंगांचा चित्रकार - ग.ना. जाधव' (प्रदीप गुजर, रुची, फेब्रुवारी २०१२) ह्या दोन साहित्य-कृतींचा संबंध 'ग्रंथाली वाचक चळवळ' असाच म्हणावा लागेल.

विज्ञानाची प्रगती व त्यामुळे होणारा लक्ष्मीचा थयथयाट; अशा परिस्थितीत सरस्वती वंदन हे व्हायलाच पाहिजे. प्रत्येकवेळी होतंच असं नाही. परंतु जेव्हा ह्याच दिशेनं काही संदर्भ वाचावयास मिळतात तेव्हा खूप बरं वाटतं. १९६२ साली मुकुंदराव किर्लोस्कर न्यू यॉर्कमध्ये भेटले व त्यांनी किर्लोस्करचा अंक मला दिला त्यावर चित्र होतं ग.ना. जाधव ह्यांचंच. अत्यंत सुंदर मुखपृष्ठ. बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना कल्पना असेल, जेव्हा टेलिफोन, मोबाईल, टीव्ही नव्हते, रेडिओचा प्रभावही कमी होता तेव्हा मासिकांची चलती होती. अशावेळी तीन चित्रकार रघुवीर मुळगांवकर, दीनानाथ दलाल आणि ग.ना. जाधव यांनी त्यांच्या कलाकृतींमुळे बऱ्याच मासिकांची मुखपृष्ठे अजरामर केली. तेव्हा हाजी कासमवाडी, ऑपेरा हाउस, खोताची वाडी व स्लेटर रोड येथे बरीच कलाकार मंडळी वास्तव्य करत होती. गायक सुदेश भोसले आणि त्यांचे वडीलही स्लेटर रोड येथे सिनेमाच्या जाहिराती रंगवत असत, तेव्हा संगणकही नव्हते. विज्ञानाची छाप कमी होती म्हणून हस्तकौशल्य हेच प्रमाण चित्रात दिसून येई. असं म्हणतात, की तेव्हा ह्या चित्रकृतींना बिदागी अल्पच मिळत असे परंतु चित्रकारांची महती मात्र जबरदस्त होती.

पूर्वीच्या काळा चित्रसृष्टीमध्येही भरपूर नाव कमावलेली मंडळी होती. त्यांचा विसर होत चालला आहे हे दिसून येतं. अशा वेळी चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांच्यावर पहिल्या प्रथमच इतक्या विस्तृतपणे लेख 'रुची'-मध्ये आला याची जाण वाचकांनी ठेवावी. कोणाला कल्पना आहे का, की भालजी पेंढारकर एवढामोठा चित्रपट-निर्माता, परंतु ते जेव्हा देवाघरी गेले तेव्हा आपला मुलगा प्रभाकर पेंढारकर यांच्यासाठी रु. १५३/- ठेवून गेले! बाबुराव पेंढारकर एवढा मोठा नट, पण त्यांनी आपल्या मुलांसाठी काय ठेवलं? कुणालाच ठाऊक नाही. सांगायचं तात्पर्य, एक सरस्वतीपूजन जेव्हा होत होतं तेव्हा लक्ष्मीचा प्रभाव कमी होता. पण आता काय झालंय, विज्ञानाची प्रगती खूप झाल्यानं हस्तकला जाऊन यंत्रकलेचा प्रभाव वाढत गेला. लक्ष्मीची अभिरुची वाढतच गेली. त्यातच नवीन प्रयोग सुरू झाले. मोबाईल फोन, टीव्ही, इलेक्ट्रॉनिक संबंध यामुळे यंत्रांचे कारभार वाढले व माणुसकीचं अभाव दिसून आला व येत आहे. अशाच वेळी गरज आहे वाचक चळवळीची व अशी योजना ग्रंथालीकडून होत आहे हे वाचकांचं भाग्यच म्हणावं लागेल.

**– गिरीश वासुदेव**
३१३, गुरुदेव, प्रभादेवी,
मुंबई ४०० ०२५
भ्रमणध्वनी : ९८२०० ००२५९

# इति जनुकाख्यानम्

डॉ. उज्ज्वला दळवी

उत्तुंग विंध्य पर्वताला नमवणाऱ्या आणि अथांग समुद्राला पिऊन टाकणाऱ्या अगस्त्य मुनींच्या जन्माची गोष्ट, देवीभागवतात सांगितली आहे आणि त्यांच्या विवाहाच्या कथेचा उल्लेख महाभारतात आहे. त्यांचा जन्म कुंभातून झाला. म्हणजे ते 'टेस्ट ट्यूब बेबी' नसले तरी 'अर्दन पॉट बेबी' नक्कीच होते. जरत्कारू मुनींसारखाच त्यांनीही लग्नाचा विचार जरा उशिराच, केवळ

**जनुक–शास्त्राच्या अर्धशतकी पुण्याईनं गेल्या हजारो सहस्रकांच्या इतिहासाची DNA–बखर वाचता आली, त्याहून अधिक रोमहर्षक काय असू शकतं? भविष्यावरच लक्ष केंद्रित झाल्यामुळे जनुकशास्त्राच्या इतिहासातले असे शेकडो विजय उपेक्षित राहिले आहेत. त्यांचा साहित्यिक उत्सव साजरा व्हायला हवा. तो झाला तर मानवाच्याच नव्हे तर अखिल जीवसृष्टीच्या कल्याणासाठी आयुष्यभर कळकळीनं झटणाऱ्या आणि झुंजणाऱ्या अनेक शास्त्रज्ञांना खराखुरा न्याय मिळेल.**

पितरांना मुक्ती मिळावी म्हणून केला. मनासारखी, सर्वगुणसंपन्न वधू कुठे मिळेना म्हणून साऱ्या प्राणिमात्रांचे उत्तम गुण वापरून, त्यांनी एक मुलगी–लोपामुद्रा–घडवली आणि ती वयात येईपर्यंत तिचं संगोपन विदर्भराजाकडून करवून घेतलं. इतर प्राणिमात्रांचे उसने गुणधर्म मानवात अंतर्भूत करण्याची कल्पना, पार शास्त्र–पुराणांच्या काळापासून माणसांना आकर्षक वाटत आली आहे.

खुद्द जनुकशास्त्राचा जन्म मात्र असा आकर्षक नव्हता. ते बापडं रीतसर भुईतूनच उगवलं. साध्या वाटाण्याच्या शेंगा आणि त्यांतले हिरवे किंवा पिवळे वाटाणे, बस्स्! ग्रेगोर मेंडेल नावाच्या धर्मोपदेशकाच्या कुतूहलाला इतकंच निमित्त पुरलं. त्यानं त्या हिरव्या–पिवळ्यांचे संकर केले, त्यातून जे काही उद्भवलं ते कौतुकानं नोंदून ठेवलं आणि त्याचा आनुवंशिकतेशी संबंध जोडला. असं फक्त निसर्गाच्या निरीक्षणावर आधारलेलं, मेंडेलचं 'वाटाण्याचं शास्त्र' म्हणजेच जनुकशास्त्र. 'तीन शिलेदार' लिहिणाऱ्या अलेक्झांडर ड्युमानं, एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर 'The Black Tulip' ही कादंबरी लिहिली. तिच्या संशोधक–नायकानं कसलाही डाग नसलेलं, अव्यंग, काळंभोर ट्युलिपचं फूल तयार करायला असेच साधे प्रयोग केले होते.

तेच शास्त्र आता परमाणूंपासून पर्यावरणापर्यंत आणि प्रतिबंधक लशींपासून पितृत्व–परीक्षेपर्यंत पसरलं आहे. सर्वसामान्य माणसाला जनुकांचे परमाणू कळत नाहीत पण परिणाम दिसतात. पूर्वीपासूनच त्या अद्‌भुत आणि रहस्यमय परिणामांचं त्याला जबरदस्त आकर्षण आणि तेवढीच भीतीही वाटत आली आहे. त्यामुळे आनुवंशिकता, जातिसंकर, जुळी किंवा तिळी मुलं अशा विषयांवर पुरातन काळापासून अनेक कहाण्या आणि आख्यायिका रचल्या गेल्या आहेत.

विष्णूचा नरसिंह अवतार, अर्जुनाचा गायनमास्तर अश्वमुख तुंबरू हे आपल्या शास्त्र–पुराणांत आहेत, तर ग्रीक मिथकांत Typhon (अनेक सर्पशरीरांवर एक मानवी धड आणि डोकं), Chimera (सिंह, बकरी, नाग या साऱ्यांचं विक्षिप्त मिश्रण), Centaur (मानवी शिर आणि धड असलेला घोडा) वगैरे मिश्र–पशुसंग्रहालयच आहे. स्फिंक्स ही मानवी चेहऱ्याची सिंह–पक्षीण ग्रीक कथानकांत दुष्ट आणि विध्वंसक, तर इजिप्तमध्ये तीच संरक्षक मानली जाते. इराणचा 'श्वानमृग' किंवा Simurgh, चिन्यांचा सुखशांती देणारा Qilin किंवा विघ्नहर्ता Bixie, लुईस कॅरोलच्या ॲलिसला भेटलेला गरुडसिंह किंवा Gryphon, गिरीश कार्नाडांचा 'हयवदन' आणि हॅरी पॉटरच्या कथेत सीरियस ब्लॅकला वाचवणारा Hippogriff याच वर्गात मोडतात.

पौराणिक आणि वैज्ञानिक कथांतल्या पशुसंकरांनी मनोरंजन होतं. कारण ते केवळ कथांमधले कल्पनाविलास असतात. पण

एकोणिसाव्या शतकात, विज्ञानाची घोडदौड सुरू झाल्यावर, काही वेड्या शास्त्रज्ञांनी असे पशू निर्माण करायचा प्रयत्न केला. त्या वेळी H.G. Wellsच्या The Island of Dr. Moreau या कादंबरीने असल्या संकरांचं हिडीस आणि भयानक रूप जगापुढे मांडलं. मेरी शेलीच्या 'फ्रॅन्केन्स्टाइन' राक्षसाचा जन्म तर जनुकशास्त्राच्या उदयाच्या पन्नास वर्षं अगोदरच झाला होता. त्या पुस्तकाचा जनुकशास्त्राशी संबंध नव्हता. पण एकवीस वर्षांच्या मेरीनं त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत इशाराच दिला होता, 'SUPREMELY frightful would be the effect of any human endeavour to mock the stupendous mechanism of the Creator of the world.' साहित्यानं समाजाला जागं ठेवलं. सुसंस्कृतांच्या संस्थांनी असल्या अघोरी प्रयोगांविरुद्ध आवाज उठवला. विज्ञानाची शुचिता जपली गेली.

विज्ञानाची वाटचाल होतच असते, पण ती भरधाव नसते. विज्ञानाला प्रत्येक प्रतिपादन प्रयोगांनी सिद्ध करावं लागतं. साहित्याला, कलांना ते बंधन नसतं. त्यामुळे साहित्याची भविष्यातली मुशाफिरी मनोरथाच्या वेगानं चालते. H.G. Wellsच्याच The Time Machine नावाच्या कादंबरीत, कालप्रवासाची गोष्ट सांगितलेली आहे. तिच्यात इ.स. आठ लाखमधल्या पृथ्वीचं वर्णन आहे. नाजूक, दुर्बळ, खुशालचेंडू एलॉई आणि त्यांना पाळून, जोपासून भक्ष्य बनवणारे बुद्धिमान पण पाशवी, हिंस्र मोलॉर्क अशा त्या वेळच्या माणसांच्या दोन जमाती मानवाच्या उत्क्रांतीची अमानुष वाट सूचित करतात. ज्या वर्षी मक्यातला जनुकपालट विज्ञानाला जमला, त्याच वर्षी आल्डस हक्सलीच्या 'The Brave New World' या अत्यंत परिणामकारक कादंबरीनं, प्रयोगशाळेत बेतलेल्या, माणुसकीचा, ममतेचा लवलेश नसलेल्या समाजव्यवस्थेचे गंभीर दुष्परिणाम जगापुढे मांडले होते. या पुस्तकात 'टेस्ट ट्यूब-बेबीज्' नसल्या तरी 'बॉटल-बेबीज्' होत्या. त्यांचे जनुककोश



त्यांच्या समाजातल्या कामानुसार बेतले जात होते. GATTACAमध्ये हीन जनुककोश लाभलेल्या महत्त्वाकांक्षी माणसांची अशा समाजात होणारी घुसमट दाखवली आहे. त्या कोंडीवर मात करायला उसने जनुकठसे वापरणं, जमवून आणलेला सारा बेत पापणीच्या एका फितूर केसामुळे धोक्यात येणं, त्यातूनही शिताफीनं वाट काढून आयुष्याचं स्वप्न साकार करून घेणं; अशा उत्कंठावर्धक प्रसंगांनी ही कथा प्रभावी झाली आहे. साहजिकच अशा कादंबऱ्यांवरचे चित्रपटही गाजले. म्हणजेच त्यांचा संदेश आणि त्यासोबत मांडलं गेलेलं विज्ञान हजारो-लाखो लोकांपर्यंत पोचलं.

जगातल्या प्रयोगशाळांमध्ये संशोधक नवनवी तत्त्वं आणि तंत्रं तपासून बघतात आणि त्यांचा वापर कसा करायचा ते ठरवतात. नव्या शोधांचे असे धागे माणसांच्या नात्यांत गुंफले, त्यातून काय गुंता होईल ते पाहिलं आणि मग त्यावर मानवीच तोडगा शोधला की विज्ञानकथा जन्मते. त्यात माणसं, त्यांची व्यक्तिमत्त्वं, मानसिकता ही तर महत्त्वाची असतातच, शिवाय मूळच्या विज्ञानाचा गोफही तितकाच पक्का असावा असतो. या गोफातले बहुतेक धागे निखळ वैज्ञानिक असतात. अशा प्रकारच्या कुठल्याही कथेचं बीज, हे असं झालं तर..? या कल्पनेत असतं. त्या गोफात त्या कल्पनेचा एक अ-वैज्ञानिक किंवा अती-वैज्ञानिक धागा बेमालूम विणलेला असतो. ज्यूल व्हर्न, आर्थर सी. क्लार्क




यांसारख्या साहित्य-ऋषींचे हे असे अती-वैज्ञानिक धागे, भविष्यात काही बाबतींत विज्ञानाच्या कक्षेला भिडले. विमानं आली, पाणबुड्या आल्या, कृत्रिम उपग्रहांमार्फत दूरसंचार जमला, चंद्रावर स्वारीही झाली, तरीही त्यांच्या कथांतल्या सगळ्याच कल्पना खऱ्या ठरल्या नाहीत. अद्याप माणूस चंद्रपृष्ठावर जेमतेम तीन दिवस (अपोलो १७, Cernan आणि Schmitt) राहू शकला आहे. त्याला 'स्वारी' म्हणणं ही मानवी फुशारकी ठरेल. गुरूच्या चंद्रांवरची मानवी वस्ती तर अजून विज्ञानरंजनातच राहिली आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून जनुकशास्त्राचे प्रयोग सुरू झाले. विसाव्या शतकाच्या मध्यावर DNAची रचना कळली. जनुकसंकर, जनुकीय उपचार, designer babies, यांचा बोलबाला सुरू झाला. जनुकपालटानं दीर्घायू होण्याचं स्वप्न जुनंच आहे. पण अर्धशतकापूर्वी, gentic engineering सुरू झाल्याझाल्या कादंबऱ्यांच्या नायक-नायिकांनी सर्वांगसुंदर होण्यासाठी जनुकपालट करून घेतले, झोपेची गरजच नाहीशी करून अभ्यासा-साठी, कामासाठी वेळ वाढवून घेतला, असाध्य रोगांवर मात केली. The Evolution या कथेत, जिवाणूंमध्ये झालेल्या जनुकपालटांमुळे सारीच प्रतिजैविकं (antibiotics) निकामी होऊन आणीबाणी निर्माण झाली. Star Trek या टीव्हीवरच्या मालिकेतल्या पात्रांनी चाकरांच्या पेशींत आज्ञाधारकपणाचं जनुक बसवलं, सर्वगुणसंपन्न मुलं होण्यासाठी गर्भांकुर बेतले, एका वेगळ्या ग्रहावर जनुकपरिवर्तितांची Genome Colony देखील वसवली.

बापडी clone केलेली डॉली मेंढी खरं तर जेमतेम सहा वर्षं जगली. विज्ञानकथां-मध्ये मात्र clonesनी धुमाकूळ घातला. लक्ष्मण लोंढे यांची 'गुंता' ही कादंबरी clonesच्या गोंधळामुळे विकासाऐवजी विनाश कसा झाला ते दाखवते. डॉ. बाळ फोंडके यांच्या 'आपुले मरण' या कथेत, जनुकोपचार आणि cloning हे विषय विज्ञानाची साथ जराही न सोडता फार प्रभावीपणे हाताळले आहेत.

हळदीचं आणि बासमतीचं अमेरिकेनं घेतलेलं पेटंट किती अन्याय्य होतं, हे आपल्याला माहीत आहे. एखाद्या बड्या कंपनीनं जित्याजागत्या माणसाच्या जनुकांचं पेटंट घेतलं तर त्या माणसाचं आणि त्याच्या लेकराबाळांचं जिणंच उद्ध्वस्त होऊन जाईल. तशा पेटंटचा जीवघेणा खेळ Next या कादंबरीत मायकेल क्रिश्टन('ज्यूरासिक पार्क' फेम) या प्रतिभाशाली लेखकानं मांडला आहे. अशा पेटंटबद्दलचा मोठा खटला सध्या अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टात चालू आहे. दहा वर्षांपूर्वी Outbreak नावाच्या गाजलेल्या चित्रपटात, जनुकपालट झालेल्या विषाणूशी अमेरिकेच्या शास्त्रज्ञांनी केलेला सामना दाखवला. त्यामुळे CDC सारख्या रोगनिवारक संस्था सजग झाल्या. चित्रपट सिनेमागृहात झळकल्यापासून काही महिन्यांतच आफ्रिकेत तशी साथ आली आणि या जनजागृतीचा फायदा झाला.

Recombinant DNAचे प्रयोग सुरू झाल्यापासून तसे तयार झालेले विषाणू पर्यावरणात निसटतील, त्यांच्यामुळे नवे रोग होतील अशी खुद्द संशोधकांनाच भीती वाटत होती. या संशोधनावर बंधनांचा अंकुश असावा असं वाटत होतं. विसाव्या शतकाच्या अखेरीला काही काळ तर त्यांनी तेवढ्यासाठी सारे प्रयोग थांबवलेच. नियंत्रक संस्थांनी संशोधनप्रक्रियेवर कडक निर्बंध आणावे म्हणून त्यांनी धरणं धरलं. त्यानंतर पेटंटची बंधनं आली, नवे कायदे लागू झाले आणि प्रयोग पुन्हा सुरू झाले. DNAच्या धाग्याची माणसांशी, समाजाशी आणि अखिल




जीवसृष्टीशी अतूट बांधिलकी आहे. कुणा माथेफिरू शास्त्रज्ञानं त्या रेशीमगाठी उसवल्या तर सारं जीवनच हातून निसटून जाईल. त्यामुळे संशोधकांपासून साऱ्यांच्याच मनांत या शास्त्राबद्दल मोठा भयगंड आहे. या भयगंडाचं सावट विज्ञानकथांवर पडतं. गेल्या चाळीस वर्षांत जगातल्या वेगवेगळ्या भाषांत अक्षरशः हजारो विज्ञानकथा लिहिल्या गेल्या. त्या लोकप्रिय झाल्या. कित्येकींवर चित्रपट काढले गेले. तेही उत्तम चालले. Outbreak-सारखे काही मौलिक अपवाद सोडले, तर या साऱ्या साहित्यातून नकारात्मक प्रचार अधिक झाला. बऱ्याच कथा विज्ञानाचा हात सोडून फॅन्टसीकडे झुकल्या.

साऱ्या विज्ञानकथांमध्ये बेमालूम मिसळलेलं ते 'असं झालं तर...?'चं एक काल्पनिक तत्त्व विज्ञान शिकलेल्या माणसांना सहज दिसतं. त्यामुळे त्या कथेच्या कल्पित पायाची त्यांना सतत जाणीव होत राहते. स्वैर, अ-वैज्ञानिक कल्पनाविलासही त्यांना समजतो. पण विज्ञान न शिकलेल्या माणसांना कित्येकदा त्यातून 'हे होईलही बुवा' असा, मुळात अभिप्रेत नसलेला संदेश मिळतो. 'एरवीदेखील सुतानं स्वर्गाला पोचू शकणारे शास्त्रज्ञ, या नव्या पीळदार शिडीनं कुठे पोचतील कोण जाणे', या विचारानं बहुजनसमाज धास्तावतो.

*'नव्या जीन्सच्या नव्या तुमानी;*
*फिटिंग चुकता घडी बिघडली।'*
*जन म्हणती, ''या 'जिनां'तराच्या*
*भयस्वप्नाने झोप उडाली ''।।'*

अशी गत होते.

जनुकशास्त्र आणि विज्ञानरंजन यांची सीमारेषाही अत्यंत धूसर, अस्पष्ट आहे. डिनोसॉरांची जनुकं सापडलेली आहेतच. क्रेग व्हेन्टरनं जैव-रासायनिक प्रक्रियांनी चक्क नवा विषाणू जन्मालाही घातला आहे. मग ज्यूरासिक पार्क खोटं का वाटावं? मानवी फ्लूच्या विषाणूनं काल पक्ष्यांच्या फ्लूची जनुकं उधार घेतली तर आज डुकराच्या फ्लूचं DNA उसनं घेतलं. या खगावतारानं आणि वराहावतारानं जगभर हाहाकार माजला. मृत्यूनं थैमान घातलं. ते अनुभवलेल्या साध्या माणसाला 'I Am Legend' मधला, माणसांची vampires करणारा विषाणू किंवा 'Methuselah Virus' मधला दीर्घायुष्याचा बेबंद फैलावणारा विषाणू असंभव कसा वाटेल? गंभीर आनुवंशिक आजाराची शक्यता असली तर गर्भबीजं प्रयोगशाळेतच रुजवून त्यांतून नेमका निकोप गर्भांकुर निवडता येतो, हे खरं. चीनमध्ये बुद्धिमत्तेच्या जनुकाचा मागोवा घेतला जातो आहेच. मग धनिकांच्या गर्भांसाठी चातुर्य, सौंदर्य विकत घेणं अशक्य का वाटावं? 'Brave New World' मधलं बाटल्यांत बेतलेलं पांचवर्ण्य खोटं कसं वाटावं? Cloning करून डॉली मेंढी उत्पन्न करता आली. ती जगली, वाढली, प्रसवली. मग Star Warsमधला Attack of the Clones होणारच नाही कशावरून? हिटलरसारख्या एखाद्या माथेफिरूच्या हातात ही नवी तंत्रं पडली तर मग बघायलाच नको. आर्यांच्या झुंडी निर्माण करायला जनुकसाचेच वापरले जातील.

असं बहुसंख्य लोकांना वाटतं.

या गैरसमजावर वैज्ञानिक मलमपट्टी कामाची नाही. त्यावर रामबाण साहित्यिक उपायच व्हायला हवा. 'असं झालं तर..?' या प्रश्नाचं उत्तर शोधताना कल्पना-विलासाच्या मुशाफिरीला मोकळं रान मिळतं. साहित्याला ते स्वातंत्र्य हवंच. पण आता जनुकशास्त्र हे केवळ भविष्यातलं शास्त्र राहिलेलं नाही. त्याच्या पाठीशी एका भरभक्कम शतकाचा इतिहास आहे. त्या शतकात कित्येक असाध्य आजारांचं मूळ या शास्त्रानं शोधून दिलं. Down's syndromeचं भिन्नमती बाळ झालेल्या

आईवडिलांना, त्यांची रंगसूत्रं तपासून पुढचं बाळ निकोप होईल की नाही हे सांगणं शक्य झालं. गर्भांकुर प्रयोगशाळेत तपासून त्यांतले निकोप तेच निवडणं जमलं. त्या आईबापांच्या हळव्या मनांवर विज्ञानाने घातलेली ती फुंकर साहित्यातही सुखद वाटेल. गेल्या तीस वर्षांत recombinant DNA वापरून इन्सुलिन-सारखी अनेक उपकारी औषधं तयार केली गेली. त्यापूर्वी सर्वस्वी इन्सुलिनवर अवलंबून असलेल्या रुग्णांमध्ये देखील, गायीचं इन्सुलिन की डुकराचं या अटीतटीच्या प्रश्नावरून, अक्षरशः जिवाची पर्वा न बाळगता, समरप्रसंग ओढवत असे. नव्या इन्सुलिनमुळे किंवा Factor VIII सारख्या इतर recombinant औषधांमुळे ज्यांचे प्राण वाचले, त्यांची जुन्या काळातल्या रुग्णांशी केलेली तुलना मोठी नाट्यमय होऊ शकते. कित्येक विषाणू-साथींचं अचूक निदान करायला PCR सारखी जलद तंत्रं निघाली. स्वाईन फ्लूच्या साथीच्या वेळी त्यांची मोठीच मदत झाली. त्या काळातलं आव्हान पेलायला शास्त्रज्ञांनी युद्धपातळीवर केलेलं काम एखाद्या रोमांचक कादंबरीचं बीज बनू शकतं. खून-बलात्कार यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचा छडा लावायला जनुकठशांचा वापर व्हायला लागला. त्याबद्दलच्या सत्य कहाण्या वाचतानाही अंगावर सरसरून काटा येतो. जनुकशास्त्राच्या अर्धशतकी पुण्याईनं गेल्या हजारो सहस्रकांच्या इतिहासाची DNA-बखर वाचता आली, त्याहून अधिक रोमहर्षक काय असू शकतं? भविष्यावरच लक्ष केंद्रित झाल्यामुळे जनुकशास्त्राच्या इतिहासातले असे शेकडो विजय उपेक्षित राहिले आहेत. त्यांचा साहित्यिक उत्सव साजरा व्हायला हवा. तो झाला तर मानवाच्याच नव्हे तर अखिल जीवसृष्टीच्या कल्याणासाठी आयुष्यभर कळकळीनं झटणाऱ्या आणि झुंजणाऱ्या अनेक शास्त्रज्ञांना खराखुरा न्याय मिळेल.

जनुकशास्त्राचा भूतकाळ रोमहर्षक होता, वर्तमानकाळ व्यवहाराशी, भौतिकाशी जुळलेला आहे आणि भविष्यकाळ अद्भुत असेल. त्याला अध्यात्माशी काही देणंघेणं नाही. पण जनुकशास्त्रासंबंधी विचार करताना छांदोग्य उपनिषदातली श्वेतकेतूची गोष्ट मनात रुंजी घालत राहते-

*बारा वर्षे अध्ययन करून श्वेतकेतु गुरुकुलाहून घरी परतता झाला. तेव्हा त्याचे पिता, उद्दालक त्यास प्रश्न करते झाले,*

*''बा श्वेतकेतु, तुजला असें ज्ञान प्राप्त झालें काय, कीं ज्यायोगें जें अदृश्य आहे तें दिसों लागतें, जें अनुभवणें शक्य नाही तें अनुभवास येतें आणि जें अनाकलनीय आहे त्याचें आकलन होतें?''*

*''नाही. असें ज्ञान कोणतें आहे?''*

*''जा. न्यग्रोध(वड) वृक्षाचें एक फळ मजपाशीं घेऊन ये.''*

*''हें आणलें.''*

*''आता तें फळ फोड.''*

*''फोडलें.''*

*''त्यांमाजीं तुजला काय दिसतें?''*

*''त्यांमाजीं सूक्ष्म बीजें दिसतात.''*

*''त्यांतलें एक बीज फोड.''*

*''फोडलें.''*

*''त्यामाजीं तुजला काय दिसतें?''*

*''काही नाही!''*


*''त्या सूक्ष्म बीजाच्या अंतर्भागीं जें अदृश्य, अनाकलनीय सार आहे त्याच्या योगेंच त्या भव्य न्यग्रोध वृक्षाचें अस्तित्व उद्भवतें. तें जें तरल, अनाकलनीय सार आहे त्यामाजींच समस्त अस्तित्वाचें स्वत्व वसतें. तेंच सत्य असतें, तेंच स्वत्व असतें आणि श्वेतकेतु, तें म्हणजेच तू आहेस.*

*तत्त्वमसि। तत्त्वमसि।''*

सूक्ष्म पेशीच्या गाभ्यातल्या जनुक-कोशातून सारी सजीव सृष्टी उद्भवते. जे जे जिवंत आहे त्याचं मूळ, डोळ्यांना न दिसणाऱ्या त्या गाभ्यात आहे. ते म्हणजेच प्रत्येक जीव, ते म्हणजेच प्रत्येक जण, ते म्हणजेच मी.

तदस्मि। तदस्मि।

**- डॉ. उज्ज्वला दळवी**
Ujjwalahd9@gmail.com




## सोन्याच्या धुराचे ठसके

पावशतकी सौदी अनुभव

## डॉ. उज्ज्वला दळवी

सौदी अरेबियासारख्या अत्यंत प्रतिकूल हवामानाच्या, कट्टर इस्लामी राज्यात उपेक्षा, अन्याय नि हालअपेष्टा सहन करत, आयुष्यातील उमेदीची पंचवीस वर्षे वास्तव्य करणाऱ्या डॉ. उज्ज्वला दळवी यांनी त्या देशाच्या अंतरंगात शिरून, ते उकलून आपल्यापुढे ठेवले आहे. आपण वाचकांनी त्याबद्दल त्यांचं कृतज्ञ असायला हवं.

**- मीना प्रभू**


**मूल्य २७५ रुपये, सवलतीत १६० रुपये**

# दिव्यत्वाच्या प्रचितीत रमणारा चित्रकार : चंदू पाठक

**प्राचार्य मदन धनकर**

चित्रकार चंदू पाठक मूळचा वरोरा येथील. राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक लक्ष्मणराव पाठक यांचे चिरंजीव चंद्रकांत ऊर्फ चंदू पाठक याचा कलाप्रवास लक्षात घेतला तर कुसुमाग्रजांचे 'पृथ्वीचे प्रेमगीत' मन:पटलावर येते. सूर्याच्या प्रेमाची आस बाळगून युगानुयुगे त्याच्या भोवती फिरणारी पृथ्वी, सूर्याच्या प्राप्तीसाठीच फिरत आहे असे वाटते. त्याप्रमाणे सार्वजनिक जीवनातील विभिन्न क्षेत्रांतील नायकांना गाठून त्यांची तैलचित्रे, जलचित्रे किंवा रेखाचित्रे काढून चंदूने आपले चित्रशतक पूर्ण केले आहे.

तारुण्यात चित्रपटाचे आकर्षण सर्वांनाच असते. पावसाला धरतीचे आणि धरतीला बीजाचे आकर्षण असते. सागराला चंद्राचे आकर्षण आहे. पुढाऱ्याला पदाचे अन् व्यावसायिकाला पैशाचे आकर्षण असते. आपल्या आकर्षणाभोवती परिक्रमा करण्यात सारेच वेडे असतात. विद्यार्थिदशेत चंदू पाठक याला चित्रपटाचे आकर्षण होते. त्यातही महानायक अमिताभ बच्चन यांच्यासाठी आपले प्राण ओवाळून टाकण्याची तयारी त्याने प्रारंभापासूनच ठेवली. अमिताभ बच्चन नायक असलेले चित्रपट म्हणजे चंदूसाठी कायम सुरू असलेला गृहपाठ. घरचे वातावरण शिक्षणाला प्राथमिकता देणारे असल्यामुळे वाचनाची आवड होती. अर्थपूर्ण गाणी गुणगुणण्यात त्याचा उत्साह नेहमीच वरच्या पट्टीत चढला. चित्रपट पाहण्यातील त्याची आवड व्यसनाच्या पातळीवर आली, तेव्हा घर अस्वस्थ झाले. पण चंदूने व्यसनाला कलासाधनेच्या चौकटीत बसवून नवा इतिहास रचला.



अमिताभ बच्चनचा चित्रपट म्हणजे चंदूसाठी भक्तीचा विषय. अमिताभचा चित्रपट अनेकदा पहिल्यामुळे त्यातील संवाद पाठ व्हायचे. जिभेवर कायम असलेली गाणी अमिताभच्या अभिनयाच्या आश्रयाने मनापुढे सतत साकार व्हायची. घरदार न सोडता अमिताभची मैत्री त्याच्या जीवनक्रमाचा अविभाज्य अंग बनली. ११ ऑक्टोबर हा अमिताभ बच्चनचा वाढदिवस. हा दिवस चंदूसाठी मुहूर्त ठरला. कोणत्याही चांगल्या कामाची सुरुवात तो याच दिवशी करू लागला. घरात प्रत्येक नवी बाब साजरी करताना ऑक्टोबर महिन्याच्या अकरा तारखेला अनिवार्य स्थान मिळाले. तोपर्यंत चित्रकाराच्या हातातला कुंचला रंग पिऊन आपले विभ्रम व्यक्त करू लागला. दरवर्षी अमिताभच्या नव्या चित्रपटातील नवे चित्र काढून चंदू 'जलसा'वर स्वारी करू लागला.

दरवर्षी ११ ऑक्टोबरला 'जलसा' आणि 'प्रतीक्षा'समोर नवे चित्र घेऊन, गर्दीतील असंख्य चाहत्यांत चंदू असायचा. आता अमिताभची-त्याची ओळख झाली. दीवार, मजबूर, डॉन, त्रिशूल व लावारीस यासारख्या चित्रपटांतील सुपरस्टारचे मूड लक्षात घेऊन काढलेली चित्रे अमिताभ बच्चनने स्वीकारली. चंदूच्या प्रेमाची खरी कसोटी लागली 'कुली' चित्रपटाच्या सेटवर अमिताभला अपघात झाला तेव्हा, साऱ्या देशात अमिताभच्या आरोग्यासाठी प्रार्थना झाली. अमिताभचे चाहते व्याकुळ अन् अधीर होऊन रस्त्यावर आले. लीलावती रुग्णालया-समोर गर्दी अनावर झाली. देशभरातून महानायकाचे चाहते मुंबईला धावले. आपले आपल्या देहावर किती प्रेम असते! ठेच लागली तर सारे शरीर कळवळून उठते. 'लाभावणी करी प्रीती' असेच त्याचे वर्णन करता येईल. कलावंतावर रसिक किंवा चाहते किती प्रेम करतात हे १९८२ च्या अमिताभच्या आजाराने सिद्ध केले. डॉक्टरी उपचारांचा दवा आणि लक्षावधी चाहत्यांचा दुवा कळला. रसिकांच्या कलावंतावरील निर्व्याज प्रेमाचा हा आकाशएवढा प्रतिध्वनी होता.

या शर्यतीत चंदू पाठक कुठे होता? चंदूने अमिताभला दिलेले पेंटिंग आपल्या निवासस्थानी लावल्याचे पत्र चंदूच्या हाती पडले. त्यानंतर अपघात झाला. अमिताभला कोलायटीसच्या आजाराने गाठले. चंदू पाठकने चंद्रपूरची वरदायिनी महाकालीस साकडे घातले. आपल्या घरापासून ५ किलोमीटर अंतरावरील महाकाली मंदिरात, त्याने अनवाणी जाऊन, देवीचे दर्शन घेत मातृशक्तीची करुणा भाकली. २१ दिवसांचा उपवास केला. त्यात त्याची पत्नी सौ. वीणा व मुलगा वैभव हेही सहभागी झाले. सांस्कृतिक

क्षेत्रातील सर्व नेते व कार्यकर्ते यांना महाकाली मंदिराच्या प्रांगणात एकत्र आणून त्याने प्रार्थनासभा घेतली. त्यानंतर महाप्रसादाचे वितरण झाले. चंद्रपुरातील कला, क्रीडा, संगीत व चित्रपट यात रुची असलेल्या शंभरवर रसिकांनी त्यात भाग घेतला. चंदूच्या अमिताभ प्रेमाने सारचे भारावले. चंदूची मुंबई वारी चालू राह्यली. वारीचे दशक पूर्ण झाले तसे चित्रांचेही. ही सारी चित्रे 'जलसा' किंवा 'प्रतीक्षा' त संग्रही आहेत.

आता, 'मी अनुभवलेला अमिताभ' हे पुस्तकच प्रकाशित झाले आहे. पुस्तकाचे प्रकाशन खुद्द अमिताभच्या हस्तेच झाले. चंदूने महानायकाला मारलेल्या मिठीचा फोटो मुखपृष्ठावर आहे. अमिताभची चंदूने काढलेली तैलचित्रे, जल-रंगातील चित्रे, रेखाचित्रे, विविध भेटींतील चित्रे पुस्तकात ठायीठायी आहेत. अमिताभच्या प्रेमाचा गड सर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची गाथा त्यात आहे. वारी जलसाची, संवादाचा जादुगर आणि 'काळा आला होता पण' ही प्रकरणे वाचकांना खिळवून ठेवणारी आहेत. कठोर परिश्रम, प्रबळ इच्छाशक्ती, चैतन्यदायी मानसिकता, सतत वर्धिष्णु असलेला आशावाद यांचा प्रत्यय त्यातून येतो. चंदू पाठक लेखक नाही, चित्रकार आहे. त्याच्या हातातील कुंचल्याची करामत गाजली आहे, पण आपल्या परिश्रमपूर्वक अनुभवांना शब्दरूप देऊन त्याने लेखणी चालवली आहे. त्यातला महानायक कृष्णधवल चित्रांत तसेच रंगीत चित्रांत आपल्यापुढे येतो. अमिताभ-बद्दलचे चंदूचे प्रेम, चित्रपटसृष्टीत स्थान मिळावे म्हणून घरून पळून जाणाऱ्या व्यक्तीचे नसून, आपल्या प्रिय नायकाला रंगचित्रबद्ध करणाऱ्या कलावंताचे आहे.

'अमिताभ एके अमिताभ' असा चंदू पाठक याचा खाक्या नाही. चंदूला व्यक्तिमत्त्वातील गुणसिद्धींचे आकर्षण आहे. व्यक्तीची महानता दिसली की चंदू लुब्ध होतो. त्याला विभूतिमत्त्वाचे अप्रूप आहे. गुणांचा उत्कर्ष मनुष्याला दिव्यत्व बहाल करतो. चालती-बोलती, हाडामासाची माणसे हिमालयाएवढी झाली की मनुष्यजातीचा गौरव होतो. व्यासांची प्रतिभा मोठी अन् शुकाचे वैराग्य मोठे; लोकमान्यांचा कर्मयोग मोठा अन् गांधीचा सत्याग्रह; सानेगुरुजींचे मातृत्व अन् बाबा आमटेंची करुणा माणसाला सतत खुणावत असते. आपल्या भोवताली अशी माणसे दिसली की चंदूचा कुंचला रंगाकडे धाव घेऊन कागदावर - कॅनव्हासवर प्रकट होतो. भारतातील अशा नरश्रेष्ठांची चित्रे चंदूने काढली आहेत. वारकऱ्याने पांडुरंगाला आळवावे अथवा रामदास्य स्वीकारलेल्याने रामाच्या पराक्रमाची महती गावी तसे. बा. भ. बोरकर यांची कविता त्याने आपल्या कुंचल्यावर शोधली. 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती। तेथे कर माझे जुळती।' दिव्यत्वाचे आकर्षण पुष्कळदा गुणगान होऊन अवतरते. चंदू पाठकने त्याला रंगातून योग्य आकाराचे भान दिले.

ऋणानुबंधाच्या गाठी स्वर्गात पडतात आणि पृथ्वीवर कायम होतात. आत्मीयतेने बांधल्यामुळे त्यांचा पीळ पक्का असतो. त्याला कधी 'मीरा के प्रभु गिरधर नागर'च्या अतूट भक्तीचा रंग असतो, तर कधी विठ्ठलाच्या सावळ्या मूर्तीचा वेध घेणाऱ्या नामदेवाच्या एकतारीचा दंग झालेला एकात्म भाव असतो. आत्मीयता स्वच्छ आकाशासारखी अवकाशाचा वेध घेणारी, कधी उत्तुंग असते तर कधी समुद्राचा ठाव घेणाऱ्या पाणबुडी-सारखी तळ गाठायला उत्सुक असते. महानायक अमिताभ बच्चन व चित्रकार कलावंत चंदू पाठक यांच्यातील स्नेहबंधाने आता असेच लेखनरूप घेतले आहे.

अभिनयाच्या रंगमंचाला व्यापून उरलेला कलावंत अमिताभ आणि त्याच्या कलाजीवनाचे पैलू साकार करण्यासाठी आसुसलेल्या हातांनी कुंचला बाळगणारा चंदू पाठक. स्नेहाचा रंग कधीच फिका होत नाही याचा प्रत्यय अमिताभ-चंदू यांची जवळीक बोलकी होते तेव्हा कळते. प्रियकराने प्रेयसीची आराधना करावी, अनुयायाने नेत्यासाठी जीव टाकावा अथवा शिष्याने गुरूच्या खांद्यावर मान ठेवावी, तसा हा स्नेह निर्धास्त समर्पणाच्या मुशीत ओतून सिद्ध झालेला असतो. अमिताभ बच्चन आणि चंदू पाठक यांच्या भक्तीचेही रसायन वेगळेच आहे.

सामाजिक कृतज्ञता निधीसाठी 'लग्नाची बेडी' हे नाटक घेऊन कलावंतांची मांदियाळी चंद्रपुरात येऊन ठेपली. जयंत मामीडवार यांचा पुढाकार होता. श्रीराम लागू आणि तनुजा यांची चित्रे काढून सर्वाआधी पत्रपरिषदेत चंदू पाठक पोचला. सुरेश द्वादशीवार यांच्या घरी नाना पाटेकर अन् राजदत्त येणार याचा सुगावा चंदूला सर्वांच्या आधी लागतो. तेव्हा नानाचे भव्य चित्र घेऊन उपस्थित चंदू नानाच्या जिज्ञासेचा विषय होतो. चंदूने पाठलाग केलेली सारी माणसे व्हीआयपी असल्यामुळे त्यांच्यापर्यंत पोचण्याचा मार्ग शोधण्यास त्याची वेगळी शोधमोहीम असते. राजकारणातील पुढाऱ्यांना गाठण्याकरता कर्मठ कार्यकर्त्यांना वेठीस धरतो. संगीताच्या क्षेत्रात तपस्वी गायकांच्या माध्यमातून तो वशिला लावतो. आध्यात्मिक क्षेत्रात भाविक आयोजकांची त्याला फार मनधरणी करावी लागत नाही. रंगभूमी व चित्रपट यातील कलावंतापर्यंत पोचणे म्हणजे दिव्यच. अशा दिग्गजांना शोधून चंदूने त्यांचा स्नेह संपादन केला आहे.

चंदू पाठकने तयार केलेली काही चित्रे संबंधितांना भेट दिली तर काही चित्रांवर स्वाक्षरी घेऊन त्यांच्या संग्रही ठेवली. या साऱ्या धावपळीत मोठ्या माणसांच्या महानतेचे त्याचे निरीक्षण एखाद्या लेखकाला शोभावे असेच आहे. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या साधेपणाला खा. विजयबाबू दर्डा यांच्या माध्यमातून चित्राद्वारे मुजरा करण्याची संधी चंदूला मिळाली. क्रिकेट विक्रमवीर सचिन तेंडुलकर याची भेट घेण्यासाठी करावा लागलेला आटापिटा, सचिनला चित्र देऊन स्वाक्षरी घेतल्यावर 'फक्त माझेच पोर्ट्रेट.. इतरांचे नाही?' असे महेंद्रसिंह धोनीकडे कटाक्ष टाकत सचिन म्हणाला तेव्हा सचिनचा माथा आभाळाला टेकल्याची जाणीव चंदूला झाली. राजीव गांधींना १९८९ च्या निवडणूक प्रचार मोहिमेत चंदूने गाठले. सही घेताना राजीवजींचे देखणेपण पाहून तो खिळला. बाजूच्या पोलीस अधिकाऱ्याने त्याला अलगद जवळ घेऊन सावरले. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्यासाठी घुटमळल्याचे वर्णन करत, अखेर नितीनजी गडकरी यांच्यामुळे भेट कशी झाली ते

चंदूकडूनच ऐकावे.

पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचे भव्य पोर्ट्रेट पाहून त्यांच्याच तोंडून 'व्हेरी नाइस' असे उद्गार बाहेर पडले. ते दोन शब्द चंदू पाठकला मिळालेले टॉनिक आहे. १ सप्टेंबर २००६ तारीख असलेले डॉ. मनमोहनसिंग यांचे पत्र 'दिव्यत्वाची प्रचिती'मध्ये आहे. शरद पवार यांना चंदूने त्यांचे चित्र भेट दिले तेव्हा, 'सुंदर काढले' असा अभिप्राय देऊन त्यांनी चित्रावर स्वाक्षरी केली. खूप प्रयत्न करूनही अटलबिहारी बाजपेयी यांची भेट होऊ शकली नाही याची रूखरूख चंदूला आहे. सोनिया गांधी यांची भेट मिळावी म्हणूनही खूप प्रयत्न करण्यात आले. आपली भेट व्हावी अशी विनंती करणारे पत्र त्यांना पाठवण्यात आले. मला स्वत:चे पोर्ट्रेट स्वीकारायला आवडत नसल्याचे सांगून, सविस्तर पत्र सोनियाजींनी पाठवले. तथापि सोनियाजींना चित्र देता येईल असा विश्वास त्याला अजूनही वाटतो.

संजीवकुमार, हेमामालिनी, राज बब्बर व राजेंद्रकुमार यांची रंगीत चित्रे काढून त्यांना भेट देता आली याचा चंदूला आनंद आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निवडणूक प्रचारार्थ आले असताना, राजुरा (माणिकगड) येथे त्यांना चित्र भेट देता आले, पण गर्दी-घाईमुळे छायाचित्र काढता आले नाही यासाठी चंदूचे मन खट्टू झाले. युवा महोत्सवाच्या निमित्ताने सुनील दत्त चंद्रपूरला आले असता, दिवंगत आमदार शामबाबू वानखेडे यांच्यामुळे, त्यांचे चित्र भेट देऊन सही घेता आली. पुढे शामबाबूंच्या सहकार्याने गोरेगाव येथील 'फिल्म सिटी'त जाण्याचा सुयोग चंदूला आला तेव्हा 'सडक' चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होते. त्यात संजय दत्तची भूमिका होती. एका दृश्याचे चित्रीकरण आटोपून संजय दत्त विसावले होते. चंदूने त्यांची भेट घेतली. छायाचित्र घेण्याची विनंती केली. नकार मिळाला. परंतु सुनील दत्त यांची भेट व चित्राद्वारे झालेला संवाद चंदूने संजय दत्त यांना ऐकवला. एवढेच नव्हे तर आपल्या संग्रहातील पोर्ट्रेट व त्याचे छायाचित्र दाखवताच संजय प्रसन्न झाला. एकत्र छायाचित्र घेण्यात आले.

दिवंगत पंतप्रधान चंद्रशेखर यांची अशीच सुखावह भेट चंदू पाठकजवळ आहे. योगगुरू रामदेवबाबा यांची भेट घेऊन त्यांचे पोर्ट्रेट चंदूने त्यांना दिले. तो सोहळा आस्था चॅनेलवर दाखवला. तेव्हा चंदूचे असंख्य नातेवाईक व चाहते यांचे फोन खणखणले, पत्रे आली. त्या सुखद आठवणी चंदूसोबत आहेत. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लक्षावधी अनुयायांसह बौद्धधर्माची दीक्षा नागपूरला घेतली. त्यानंतर १६ ऑक्टोबर रोजी, लगेच चंद्रपूरला त्यांनी आपल्या लक्षावधी अनुयायांना दीक्षा दिली. त्यावेळी बाबासाहेबांचा मुक्काम चंद्रपूरच्या विश्राम भवनात होता. त्या घटनेचे स्मरण म्हणून विश्राम भवनाच्या अतिथी स्वागतगृहात डॉ. बाबासाहेब व माईसाहेब आंबेडकर यांचे एक तैलचित्र लावण्यात आले आहे. ते चित्र चंदू पाठक याचे असून त्याचे अनावरण सी. एस. थूल यांनी केले. ही संस्मरणीय घटना आपल्या कुंचल्याने कायम झाली याचा मनस्वी आनंद चंदूला आहे.

चंदू पाठक याने काढलेली काही पोर्ट्रेट्स भव्य म्हणजे ४ फूट बाय ६ फूट आहेत. सरदार वल्लभभाई पटेल, बाबा आमटे, राजीव गांधी, साधनाताई आमटे, राजीव गांधी व गुरुमाऊली गंगामाई ही पूर्ण आकाराची चित्रे तितकीच सरस उतरली असून संबंधित सभागृहाची शान वाढवणारी ठरली आहेत. चंदू पाठक शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात सेवारत आहे. त्यामुळे गुणग्राहक शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रशंसेस तो पात्र ठरला आहे. दहशतवाद-विरोधी पथकाचे प्रमुख हेमंत करकरे मुंबईच्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झाले. ते चंद्रपूरला पोलीस अधिक्षक असताना त्यांनी दिवाळी शुभेच्छा पत्र चंदू पाठककडून काढून घेतले होते. नक्षलवादी चळवळीचा परिचय देणारी ती धैर्यशाली चेतावणी होती. चार पानी फोल्डरच्या पहिल्या पानावर 'रक्तपाताची भाषा बोलणाऱ्या नक्षलवाद्यांशी लढाई ही या देशातील लोकशाहीवर विश्वास असणाऱ्या प्रत्येक नागरिकाची आहे' अशी वाक्ये असून शेवटच्या पानावर 'सुजलाम्-सुफलाम' अशा आपल्या मातृभूमीवर घाला घालणाऱ्या दहशतवाद्यांशी मुकाबला करण्यास महाराष्ट्र पोलीस सज्ज आहे' अशा ओळी आहेत. हेमंत करकरे यांचा अंत दहशतवाद्यांच्या हल्ल्यातच व्हावा हा किती दुर्दैवी योग आहे.

चित्रकार म्हणून चंदू पाठकचा लौकिक खूप आहे. त्यामुळे अनेक लेखकांनी आपले कथासंग्रह, कवितासंग्रह, एकांकिका संग्रह, नाटक व स्मरणिका यांची अर्थपूर्ण आणि आकर्षक मुखपृष्ठे त्याच्याकडून काढून घेतली. भारतीय टपाल खात्याने वीर बाबुराव सेडमाके यांचे टपाल तिकीट डिझाइन चंदू पाठक याच्याकडूनच काढून घेतले. ते प्रकाशित आहे. नागपूरचा त्रिशताब्दी महोत्सव २००२ साली झाला. त्यानिमित्त ३०० वर्षांचा इतिहास प्रत्यक्षात चित्रांकित व रेखांकित करण्याची कल्पना मुख्य अभियंता देवदत्त मराठे यांना सुचली. त्यांनी ही जबाबदारी चंदू पाठक यांच्याकडे दिली. या कामाचा मोबदला न घेता चंदू पाठकने हे काम केले. नागपूर शहराची स्थापना, ऐतिहासिक स्थळे, गौरवशाली इतिहासाचे शिल्पकार, सुप्रसिद्ध सीताबर्डीची लढाई, तत्कालीन नाणी, यासोबत मोगल, ब्रिटिश व भोसलेकालीन राजवटींची माहिती सांगणारी चित्रे चंदू पाठककडून काढून घेतली. ३ फूट बाय ५ फूट अशा भव्य आकारात ही चित्रे काढण्यात आली. १९९९मधील असाच महाराष्ट्र शासन आयोजित झाडीपट्टी पर्यटन महोत्सवदेखील चंदू पाठकच्या कुंचल्याने सजला होता.

गेली २५ वर्षे सतत चंदू पाठकचा कुंचला फिरत आहे. चरख्यातून सहज सूत निघावे तशी चित्रे तयार होत आहेत. आपली गुणवत्ता आणि वैशिष्ट्ये सांभाळून.

**– प्राचार्य मदन धनकर**
विद्यानगर, गजानन महाराज मंदिर मार्ग,
चंद्रपूर ४४२ ४०१

**मराठी माणसाची बुद्धिप्रतिभा व चांगुलपणा यांचे संरक्षण व संवर्धन हा ध्यास घेऊन 'थिंकमहाराष्ट्र डॉट कॉम' हे वेबपोर्टल चालवले जाते. त्या पोर्टलवरील दोन लेख...**

# 'समतोल' : परतुनी जा पाखरांनो...

**ज्योती शेट्ये**

दोघांच्याही डोळ्यांना अश्रूंच्या धारा, मनात काहूर, कितीतरी दिवसांनी होणारी भेट.... कदाचित परतभेटीची शक्यता मावळलेली असताना! मायलेकरांच्या त्या भेटीने उपस्थितांचे डोळेही पाणावले. ही मायलेकरे होती बिहारची आणि त्यांची भेट घडवून आणणारी व्यक्ती होती मुंबईची; 'समतोल' ह्या संस्थेसाठी काम करणारा कार्यकर्ता होता तो.

आपण कल्पनाही करू शकणार नाही असे उपक्रम समाजात कुणीकुणी अपार कष्ट घेऊन सद्भावनेने राबवत असतात. 'समतोल' हा असाच आगळावेगळा प्रयत्न. 'स' म्हणजे समता, 'म' म्हणजे ममता, 'तो' म्हणजे तोहफा आणि 'ल' म्हणजे लक्ष्य. घरदार सोडून मुंबईच्या महासागरात आपणहून दाखल व्हायला आलेल्या बालकांना, त्यांच्या माता-पित्यांकडे परत नेऊन सोडणे हे 'समतोल फाउंडेशन'चे लक्ष्य आहे.

२००६ आणि २००८ या दरम्यान घेण्यात आलेल्या पाहणीनुसार मुंबईच्या फक्त सी.एस.टी.रेल्वे स्टेशनात रोज दहा ते पंधरा मुले घर सोडून येतात. सी.एस.टी., कल्याण, कुर्ला आणि दादर ह्या स्टेशनांवर मिळून रोज शंभर ते दीडशे मुले मुंबईत दाखल होतात. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर अशी एक लाख बेपत्ता मुले वर्षाला सापडतात. भारतात ती दहा लाख तरी असावीत.

**विजय जाधव**



**घर सोडून आलेली, घरून पळून आलेली लाखभर मुले मुंबईच्या वेगवेगळ्या स्टेशनांवर सापडतात. त्यांच्या अनिकेत अवस्थेने विजय जाधव बेजार झाले आणि त्यांनी अशा मुलांना शोधून त्यांच्या घरी पोचवण्याचा उद्योग सुरू केला. त्यामधून निर्माण झाले समतोल फाउंडेशन.**

'आजची मुले भारताची भावी पिढी, भावी नागरिक आहेत' ह्या गोंडस वाक्यातल्या भावी पिढीत मोठ्या प्रमाणात उद्याची गुन्हेगार (संभाव्य) पिढीही अंतर्भूत आहे. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे!

समाजाचा तोल बिघडलेला, बिघडत चाललेला आहे आणि वेळीच सावध व्हावे म्हणून विजय जाधव आपल्या परीने एकटेच ह्या समस्येवर काम करू लागले. विजय जाधव हे आयटीआयचा अभ्यासक्रम पूर्ण करून गोदरेजमध्ये काम करत होते. पण नंतर त्यांनी एम.एस.डब्ल्यू.पर्यंतचे शिक्षण घेऊन पूर्णवेळ सामाजिक कार्यकर्ता बनण्याचे ठरवले.

२००४ साली त्यांनी रेल्वे स्टेशनच्या मुलांवर लक्ष ठेवून, त्यांच्यासाठी काम सुरू केले. कामाचा पसारा वाढत गेला. त्यात त्यांना समाजातल्या चांगल्या लोकांचा पाठिंबा मिळाला. प्रथम रेल्वे स्टेशन हेच ऑफिस होते. नंतर संस्थेचे एक विश्वस्त माधव जोशी (ठाणे) ह्यांचे घर हे संस्थेचे ऑफिस केले गेले. आणि आता, संस्थेचे दादर येथे ऑफिस आहे. संस्थेत वेतन घेऊन काम करणारे सोळा कार्यकर्ते आहेत.

''आई-बाप खूप मारायचे म्हणून मी इकडे आलो. मग भंगार गोळा करणे आणि काही इतर सटर-फटर कामे करून रोज शंभर रुपयांच्या आसपास माझी कमाई होत असे. त्यांतले निम्मे मी जुगारावर खर्च करायचो. तीस-चाळीस रुपये व्यसनात आणि उरलेले खाण्या-पिण्यासाठी खर्च होत. अशा प्रकारे मी जगत होतो. मग ह्या संस्थेचा 'दादा' मला इकडे घेऊन आला आणि आता मी खूश आहे, घरी परत जात आहे.'' दहा वर्षांच्या गोपाळचे हे प्रातिनिधिक बोल. मुलांचा संस्थेत येण्यापूर्वीचा भयावह जीवनक्रम थोड्याफार फरकाने सांगणारे. विनाशाच्या टोकाकडे झपाट्याने जाणाऱ्या मुलांचा तोल सांभाळण्यासाठी संस्थेचे कार्यकर्ते कष्ट घेत असतात.

मुंबईच्या बॉलिवूडचे, चकचकाटाचे आकर्षण, पालकांचे दुर्लक्ष, शैक्षणिक आबाळ, कधी अतिदारिद्र्य... आणि कधी प्रलोभन दाखवून पळण्यास प्रवृत्त करणाऱ्या वाईट लोकांच्या तावडीत सापडलेली मुले.... कुठून-कुठून आणि कशा कशा कारणाने

रेल्वेचा प्रवास करत मुंबईत दाखल होतात आणि रेल्वेचे फलाट हे त्यांचे घर बनते. 'समतोल'चे कार्यकर्ते सीएसटी, कल्याण, कुर्ला आणि दादर ह्या स्टेशनांवर आढळणाऱ्या अशा मुलांवर लक्ष ठेवून असतात. त्यांच्याशी संवाद साधतात व त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करतात. त्यांना ह्या कामात रेल्वे-कर्मचारी, पोलिस, स्टॉलधारक, अन्य सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते, हमाल आणि ॲक्सिडेंट हमाल ह्यांची मदत होते. अपघातग्रस्तांना आणि अपघातांत मृत्यू पावलेल्या व्यक्तींना उचलणारे, मदत करणारे ते ॲक्सिडेंट हमाल! त्यांची मानसिकता वेगळीच. त्यांची मदत चोवीस तास उपलब्ध असते, असा कार्यकर्त्यांचा अनुभव.

मुले राजी झाली, की संस्था पोलिसांकडे जाऊन मुलांची नोंदणी करते आणि त्यांना ठाणे येथील शेल्टरमध्ये आणले जाते. शेल्टर ही राहण्याची तात्पुरती सोय आहे, तिथूनच मुलांच्या पुनर्वसनाला सुरुवात होते. तेथे त्यांची वैद्यकीय तपासणी होते. व्यसनाधीनतेचे प्रमाण शोधण्यात येते. त्यांना वाईट सवयींपासून परावृत्त करायला सुरुवात होते. शेल्टरची जागा ठाणे महापालिकेने समतोलला भाड्याने दिली आहे.

क्षुल्लक भांडणे किंवा अन्य कोणत्यातरी कारणाने घरून पळून आलेली, पण अजूनही न बिघडलेली व घराचा पत्ता लगेच सांगणारी मुलेही आढळतात. त्यांच्या पालकांचा शोध घेऊन, त्यांना शेल्टरमध्ये बोलावून घेऊन, परत पोलिसांकडेच जाऊन, त्या मुलांना आईबाबांच्या ताब्यात देण्यात येते. अशा मुलांची संख्या खूप आहे.

बाकीच्या मुलांसाठी चार टप्प्यांत, चार ते सहा आठवड्यांचे, 'मनपरिवर्तन शिबीर' मुरबाडजवळ मामणोली येथे घेण्यात येते. पहिला टप्पा असतो, तो जीवनातले शिस्तीचे महत्त्व पटवून देण्याचा. अनेक दिवस उघड्या जगात वास्तवाचे चटके खाऊन हीनदीन आणि असुरक्षित जीवन जगलेल्या मुलांना, ह्या वास्तव्यात एकत्र, सुरक्षित वातावरणात राहण्याचा अनुभव मिळतो. त्यांच्या मनात त्यांच्या घराची आठवण जागृत होऊन, त्यांनी घरी परतावे हा प्रयत्न शिबिरात होतो.

दुसरा टप्पा असतो तो मुलांना चांगले आणि वाईट ह्यांतला फरक समजावण्याचा. आपल्या कल्पनेतले जग शोधण्यासाठी घराबाहेर पडलेली ही मुले, लहान वयात आईबाबांशिवाय उघडी पडलेली असतात. त्यांना समाजातल्या वाईटपणाचे दर्शन घडलेले असते. ती उपेक्षेची धनी असतात. म्हणून मुलांना नीतिमूल्ये, चांगुलपणा वगैरेची ओळख करून देत त्यांच्यातून चांगली व्यक्ती घडवण्याचा प्रयत्न होतो.

तिसरा टप्पा असतो तो नात्यांचे महत्त्व पटवून देण्याचा. विशेषतः मुलांना त्यांच्या वाढत्या वयात त्यांच्या आई-वडिलांची भूमिका काय असते आणि काय असावी व मुलांनीही कसे वागायला पाहिजे ह्याचे मार्गदर्शन केले जाते. वेगवेगळ्या साधनांनी कौटुंबिक जीवनाची महती आणि महत्त्व मुलांना सांगण्यात येते. मुलांनासुद्धा पपेट-शो वगैरे करून, जीवनातले प्रसंग सादर करायला लावतात. त्यामुळे त्यांना अंतर्मुखता लाभू शकते.

चौथा टप्पा असतो, जीवनाचे महत्त्व विशद करण्याचा. जगण्यासाठी ध्येय असावे, दिशा असावी हा विचार पक्का करण्याचा. यशस्वी लोकांना बोलावून त्यांचा जीवन-संघर्ष, त्यांच्या जीवनाची वाटचाल मुलांना त्यांच्याबरोबरच्या संवादातून दाखवली जाते. त्याद्वारे त्यांच्या मनात जीवनाबद्दल सकारात्मक दृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न असतो.

शिबिराच्या शेवटी मनपरिवर्तन झालेली मुले समारंभानंतर घरी जाण्यासाठी निघतात. स्थानिक नेते, पोलिस, देणगीदार आणि मुलांचे आईवडील समारंभाला हजर असतात. आईवडिलांना मुलांची 'परतभेट' हा तोहफा पोलिसांच्या उपस्थितीत कायदेशीरपणे दिला जातो. कार्यकर्त्यांच्या कष्टांची पूर्तता त्या दिवशी होते. साधारणपणे, एका शिबिरात पंचवीस मुले असतात. वर्षाकाठी चार ते पाच शिबिरे होतात व तेवढी मुले आपापल्या घराकडे परततात.

बालकहक्क सांगतो, की मुलांनी आई-बाबांकडे राहणे हा त्यांचा हक्क आहे, आणि ते आईवडिलांचे कर्तव्य आहे. मुलांच्या कल्याणासाठी अशा मुलांच्या आई-वडिलांचे समुपदेशन करण्याचे काम समतोल संस्था करते. मुलांना त्यांच्या आई-वडिलांपर्यंत पोचवल्यावर त्यांनाही चांगल्या प्रकारे



**शिबिरानंतर मुलांना त्यांच्या पालकांकडे सुपूर्द केले जाते**



'समतोल'कडून केल्या जाणाऱ्या कार्याबद्दल जाधव यांना 'नीरा गोपाल पुरस्कार' देण्यात आला.

समजावण्यात येते. संस्थेतर्फे पोलिसां-साठीही कार्यशाळा घेण्यात येतात. पोलिस जेवढ्या संवेदनशीलपणे अशा मुलांकडे पाहतील, तेवढी ही समस्या दूर होण्यास हातभार लागेल, असे संस्थेतील कार्यकर्त्यांना वाटते.

सरकारतर्फे प्रत्येक जिल्ह्यात बाल-सुधारगृह असते. पळून घराबाहेर पडलेल्या मुलांना तिथे नेण्यात येते. त्या मुलांनी परत घरी जावे किंवा काय करावे, हे पोलिसांच्या कक्षेत नाही आणि अपुऱ्या संख्याबळामुळे व इच्छाशक्तीच्या अभावाने त्यांना ते शक्यही होत नाही. तर तिथल्या मुलांना 'समतोल' आपल्या ताब्यात घेऊन, त्यांना स्वेच्छेने त्यांच्या आई-बापापर्यंत पोचवण्याचे काम करते. आईवडिलांना जर येथे येणे शक्य नसेल तर कार्यकर्ते मुलांना घेऊन त्यांच्या गावापर्यंत जातात. स्थानिक पोलिसांच्या आणि साक्षीदारांच्या उपस्थितीत मुलांना आई-वडिलांकडे सुपूर्द करतात.

संस्थेचे अध्यक्ष आणि कामाच्या मूळ कल्पनेचे प्रणेते विजय जाधव सांगतात, की संस्थेच्या प्रयत्नांतून २००४ ते २०११ पर्यंत पंधराशे मुले आपापल्या घरी गेली आहेत. या कामासाठी पैसे तर लागतातच, ते समाजाकडून मिळतातही. काही मोठ्या संस्थाही प्रायोजक होतात, पण खरी गरज आहे ती प्रेरणा घेऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची. त्यांचे सध्याचे साथीदार आहेत नितीन, उर्मिला, लता, अमित वगैरे.


या कार्यकर्त्यांनी सांगितले, की घर नसलेल्या किंवा कोणत्याही परिस्थितीत घरी जाणारच नाही असे म्हणणाऱ्या मुलांना आश्रमशाळेत ठेवण्यात येते. प्लॅटफॉर्म ज्ञानमंदिर ही शाळा विश्व हिंदू परिषदेतर्फे नागपूर येथे चालवण्यात येते, तिथेही ह्या मुलांना पाठवण्यात येते. आतापर्यंत अडुसष्ट मुले तिथे गेली आहेत. अशी शाळा मुंबईतही सुरू करण्याची विजय जाधव ह्यांची इच्छा आहे.

विजय जाधव व त्यांचे साथीदार कार्यकर्ते यांच्याकडून त्यांच्या कार्याची माहिती ऐकताना, मला विवेकानंदांचे वाक्य आठवले. ते म्हणत, 'समाजात दुर्गुणी, वाईट माणसे मोठ्या प्रमाणात एकत्र येतात आणि चांगली माणसे एकत्र येत नाहीत.' म्हणून कुमार्गाने जाणाऱ्या मुलांची संख्या वाढत आहे.

**– ज्योती शेट्ये**
भ्रमणध्वनी : ९८२०७३७३०१
jyotishalaka@gmail.com

**– समतोल फाउंडेशन**
संपर्क : १/४, अहमद उमर बिल्डिंग, डॉ. डिसिल्वा रोड, दरबार हॉटेल समोर, दादर (प), मुंबई-२८
दूरध्वनी : (०२२) २४३७४३१६
samatolfoundation@gmail.com
समतोल फाउंडेशन वेबसाइट
www.samtol.org

## यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी आरंभी प्रसिद्ध झालेले पुस्तक




## यशवंतराव चव्हाण
### माणूस आणि लेखक
### डॉ. प्रकाश दुकळे

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, कृषि-औद्योगिक क्रांतीचे प्रणेते अशा विविध पैलूंनी समृद्ध असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून यशवंतराव चव्हाण यांना ओळखले जाते.

मात्र, 'यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक' या ग्रंथात, डॉ. प्रकाश दुकळे यांनी, यशवंतरावांच्या अभिरुचीसंपन्न सर्जकतेचा धांडोळा घेताना, त्यांच्या उपलब्ध वाङ्मयकृती आणि प्रकाशित-अप्रकाशित पत्रसंग्रह यांच्या आधारे यशवंतरावांची बहुश्रुत रसिकता, सर्जनशीलता आणि एकूणच वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा परामर्श घेतला आहे.

यशवंतरावांमधील कर्तव्यकठोर तरी हळव्या 'माणूस'पणाच्या हृद्य पैलूवरही डॉ. दुकळे यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. एकूणच यशवंतरावांच्या अष्टावधानी व्यक्तिमत्त्वाची जाणीव हा ग्रंथ वाचताना होईल...

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

सांस्कृतिक नोंदी ठेवा

# शुल्बसूत्रे–वेदकाळातील मोजमाप

## दिनेश वैद्य

वेदकाळात भूमापन दोरीने होत असे. दोरीवर मोजमाप करण्याकरता सम अंतरावर काही खुणा असत, त्यांना मात्रा म्हणून संबोधत. शुल्बसूत्रांच्या आधारे भूमापन, वास्तू, रंगमंच, मंदिरे, प्रासाद व अनेक शिल्पे यांचे मापन होऊन, त्यानुसार ती बांधली जात असत. शुल्बशास्त्राचा खरा उपयोग झाला तो वैदिक काळात: यज्ञवेदी बांधणे, यज्ञकुंडाचे मोजमाप करणे व यज्ञमंडपाचे मोजमाप करणे यासाठी. यज्ञवेदीचे व चितीचे आकार हे चौकोनी, त्रिकोणी व वर्तुळ असे असत किंवा यज्ञवेदी पक्षांच्या आकारांच्यादेखील असत. जरी आकार निरनिराळे असले तरी ते समक्षेत्रफळाचे असावेत असा दंडक होता, निरनिराळ्या यज्ञांकरता वेगवेगळ्या वेदी बांधल्या जात असत व यज्ञाचा जसा हेतू तसे त्यांचे आकारमानही मोठे होत जाई, प्रचंड अशा वेदी बनवाव्या लागत. क्षेत्रफळ वाढत असे पण त्याचे प्रमाण मात्र ठरलेले असे. वेदी प्रमाणाच्या बाहेर गेल्या, की ज्या कारणाकरता यज्ञ आखला गेला असे, ते कारण वा तो हेतू मुळी साध्यच होत नसे. त्यामुळे वेदी किंवा चिती आखण्याचे काम प्रमाणबद्ध असे.

त्यासाठी शुल्बसूत्रे लिहिली गेली. त्यामध्ये अनेक प्रमेये तयार झाली. ही प्रमेये खगोलविज्ञान, यज्ञशास्त्र, अवकाशशास्त्र यांतील लांबी, रुंदी, व्यास, परीघ, त्रिज्या ठरवणे, गतीची गणिते करणे यांसाठी वापरली गेली.

शुल्बसूत्रांचा भूमितीची सूत्रे म्हणून पाश्चिमात्यांनीही गौरव केलेला आहे व त्यांचा वापर चांगल्या पद्धतीने होत आहे.

**पोथ्यांच्या डिजिटायझेशनचे काम करणारे दिनेश वैद्य**



**नाशिकचे दिनेश वैद्य यांनी शहरातील हस्तलिखित पोथ्या गोळा करण्याचा व त्यांची जीर्ण होत चाललेली पाने स्कॅन करून ठेवण्याचा उपक्रम आरंभला. त्यांची अशी अडीच लाखांहून अधिक पोथीपाने 'सेव्ह' झाली आहेत. त्यांची इ–लायब्ररी करण्याची कल्पना आहे. त्यातील एका पोथीचा परिचय. यावरून त्यांच्याकडे केवढा सांस्कृतिक धनसंचय होत आहे याची कल्पना येईल.**
**'थिंक महाराष्ट्र' वर असे 'वेडे' लोक भेटतात.**

ख्रिस्तपूर्व आठशे वर्षांआधी बौद्धायन आणि आपस्तंब या ऋषींनी आपल्या शुल्बसूत्रांमध्ये वैदिक यज्ञांसाठी विविध पद्धती व यज्ञवेदींच्या निर्मितीसाठी आवश्यक अशी सूत्रपद्धत दिली आहे.

यज्ञामध्ये प्रथम काम होते ते म्हणजे यज्ञासाठी लागणारी शुद्ध अशी पूर्व शोधणे. शुद्ध पूर्व दिशा शोधण्याचे कारण म्हणजे सूर्याचे उत्तरायण व दक्षिणायन, ह्यामुळे शुद्ध पूर्व मिळत नसे. ह्या सूत्रानुसार ज्या भूभागावर यज्ञवेदी करायची आहे, त्या भूभागाच्या मध्यावर लाकडाचा दंड सद्यस्थितीतील पूर्वेकडे रोवला जायचा व ज्यावेळी पंचांगानुसार दक्षिणायन सुरू होते. त्यावेळी दंडाच्या मागील बाजूस सूर्योदयाच्या वेळी पडणारी सावली अंकित केली जायची. अशा प्रकारे दक्षिणायन ते पुन्हा दक्षिणायन ह्या एका संवत्सराच्या (वर्षाच्या) काळात येणाऱ्या अंतराचा मध्य काढून तो बिंदू शुद्ध पूर्व म्हणून यज्ञात वेदी करण्याकरता उपयोगात आणला जाई.

यज्ञकुंडे ही अनेक प्रकारची असतात. १. चौकोन कुंड, २. योनीकुंड, ३. अर्धचंद्र, ४. त्रिकोणकुंड, ५. वृत्तकुंड, ६. षटकोन कुंड, ७. अष्टकोन कुंड, ८. पद्मकुंड व श्रौतसूत्रांकरता अनेक प्रकारच्या चितींमधील यज्ञकुंडे. ही सर्व प्रकारची कुंडे बनवताना जो यजमान (यज्ञकर्ता) यज्ञ करत आहे (करू इच्छित आहे) त्याच्या उंचीप्रमाणे कुंडाची निर्मिती होत असते, मोजमापे होत असतात.

मोजमापे सूक्ष्म असत. त्यांचे प्रमाण पुढील पानावरील चौकटीत दिले आहे. ह्या सूक्ष्म प्रमाणापेक्षाही सूक्ष्म परिमाणे 'कुंडरहस्य', 'कुंडरचना' आदी ग्रंथांत मिळतात. ही सूक्ष्मतम परिमाणे यज्ञकुंडासाठी वापरत, कारण त्यांतील औषधींच्या हवनामुळे व अग्नीच्या संयोगाने (Cumbuction) औषधींचे विघटन होत असे. विघटन होण्यासाठी अग्नीचे व वायूचे एकत्रीकरण योग्य अंशांतच होणे गरजेचे असे. ह्या संयोगासाठी सूक्ष्म अंतर असणे ही त्या यज्ञकुंडाची गरज आहे. म्हणूनच 'कुंडार्क' ह्या ग्रंथात असे म्हटले आहे, की कुंडाची मापे ही बालाग्र प्रमाणानेही चुकली तर यज्ञकुंडात लाखो आहुती दिल्या तरी त्यांचा परिणाम हा शून्य मानला जातो.

शुल्बसूत्रे ही अनेक ऋषींनी त्यांच्या

मोजमापे (सूक्ष्म) पुढीलप्रमाणे : यजमानाला भिंतीच्या बाजूला पायांच्या चवड्यांवर व हात वर करून उभे करायचे. ते अंतर दोरीने मोजायचे. त्यानंतर यज्ञवेदी बांधण्यासाठीच्या सूक्ष्म मापन तंत्राची निर्मिती–हात वर करून मोजलेले अंतर, त्याचे पाच भाग करायचे. म्हणजे एक हस्त प्रमाण–

| | | | |
|---|---|---|---|
| १ हस्त प्रमाण | – (भागिले) | २४ भाग | = १ अंगुल |
| १ अंगुल प्रमाण | – | ८ भाग | = १ यव |
| १ यव प्रमाण | – | ८ भाग | = १ युका |
| १ युका प्रमाण | – | ८ भाग | = १ लिसा |
| १ लिसा(लिक्षा)प्रमाण | – | ८ भाग | = १ बालाग्र |
| १ बालाग्र प्रमाण | – | ८ भाग | = १ रज |
| १ रज प्रमाण | – | ८ भाग | = १ रेणू |
| १ रेणू प्रमाण | – | ८ भाग | = १ त्र्यसरेणू |
| १ त्र्यसरेणू प्रमाण | – | ८ भाग | = १ परमाणू |
| १ परमाणू प्रमाण | – | ८ भाग | = १ सूक्ष्म परमाणू |
| १ सूक्ष्म परमाणू प्रमाण | | | |

संशोधनानुसार वेगवेगळ्या परिभाषेत लिहिलेली आहेत. १. बौधायन शुल्बसूत्र, २. आपस्तंब शुल्बसूत्र, ३. कात्यायन शुल्बसूत्र, ४. मनू (मानव) शुल्बसूत्र, ५. मैत्रायन शुल्बसूत्र, ६. वराह शुल्बसूत्र, ७. वधुला शुल्बसूत्र त्यांत अनेक प्रकारची बेरीज, वजाबाकी, भागाकार, गुणाकार, वर्गमूळ, घनमूळ, बौधायन सूपलब्धी वगैरे व अनेक प्रयोगांची रेलचेल आहे.

**बौधायन :** बौधायन ऋषींनी भूमितीच्या प्रमेयांची सर्वात जास्त निर्मिती ह्या ग्रंथात केली आहे. त्यात यज्ञवेदी, चिती बांधावयास उपयोगी सूत्रांची व्याख्या केलेली आहे.

**आपस्तंब :** ह्यात बौधायन सूत्रांच्या बरोबरीने अजूनही काही प्रमेयांची निर्मिती किंवा प्रमेये सोडवण्याच्या क्रमातला बदल आढळतो, वेदी व चितींची मापे वेगवेगळी व आणखी सूक्ष्म केल्याचे दिसते.

**कात्यायन :** कात्यायन ऋषींनी सर्व सूत्रांचे सूक्ष्मतम तपशील तयार केले व मापे मोजण्याचे सूत्र आणखी सूक्ष्म केले. त्यामुळे कात्यायन सूत्रानुसार वेदी व यज्ञकुंड बनवणाऱ्याला उत्तम असे भूमितीचे ज्ञान होत असे.

**मानव :** मानव सूत्रांमध्ये तिन्ही सूत्रांपेक्षा मोजण्याचे तंत्र, तसेच व्यासावरून वर्तुळाची त्रिज्या व त्यानुसार यज्ञकुंड बांधण्याची एक वेगळीच रीत विकसित केली आहे. म्हणजेच चौरस वर्तुळाकार किंवा वर्तुळ चौरसाकार क्षेत्रफळाएवढा करणे अशी समसमान मापन पद्धत दिली आहे.

सर्व शुल्बसूत्रांत कोणत्याही त्रिकोणाएवढा वर्ग रेखाटणे, तो कोणत्याही वर्गाचा दुप्पट, तिप्पट किंवा एक तृतीयांश एवढा असावा, असे वर्तुळ रेखाटणे की त्याचे क्षेत्रफळ दिलेल्या वर्गाच्या क्षेत्रफळा–एवढे असेल, अशा स्वरूपाची भूमितीची वापरात असणारी किंवा नसणारी पण शुद्ध पद्धत शुल्बसूत्रांत आहे. शुल्बसूत्रांवर अजूनही संशोधन अपेक्षित आहे, त्यामुळे संपूर्ण विश्वाला त्याचा उपयोग होईल व आजच्या भूमितीचे शुल्बसूत्रांप्रमाणे सुसूत्रीकरण होईल.

**– दिनेश मोहनीराज वैद्य**

६, रामदर्शन सोसायटी, काळाराम मंदिर, पंचवटी, नाशिक ४२२००३

भ्रमणध्वनी – ९८२२०२९१९८


dmv1974@gmail.com

* दिनेश वैद्य 'यज्ञसंस्था आणि व्यवस्थापन' या विषयाच्या डॉक्टरेटसाठी अभ्यास करत असून ते पोथ्यांच्या डिजिटायझेशनचे काम करत आहेत. या प्रयत्नातून पोथ्यांत दडलेले ज्ञान डिजीटल स्वरूपात सर्वांसाठी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस आहे. आतापर्यंत त्यांनी अडीच लाख फोलिओंपेक्षा (दोन पृष्ठे मिळून एक फोलिओ) अधिक फोलिओंचे डिजिटायझेशन केले आहे...

**'थिंक महाराष्ट्र'शी संपर्क साधण्यासाठी**

thinkm2010@gmail.com

फोन : ९०२९५५७७६७ किंवा (०२२) २४१८३७१०



बौधायन शुल्बसूत्र या ग्रंथाच्या पानाचा नमुना

# ‘नंतर बघू...’

## डॉ. माधवी मेहेंदळे

अधेमधे करत असते तसा त्या दिवशी पण तुला फोन केला. तशी आपली ‘फोनमैत्रीच!’ दिवसाच्या-आठवड्याच्या धावपळीत एसएमएसने कुठली तरी वेळ साधायची आणि मग फोनवर मनं मनसोक्त मोकळी करायची. त्याला कुठलाही आडपडदा नाही. कुठलीही कुंपण नाही. मनं मोकळी म्हणजे अगदी स्वच्छ मोकळी!

आपली प्रत्यक्ष भेट दुरापास्तच! आपण दोघींनीही ते निर्मळ मनाने मान्य करून टाकलंय. मी माझ्या वैद्यकीय जगात गुरफटलेली आणि तू तुझ्या कॉर्पोरेट विश्वात हरवलेली.

तू फोन घेतला नाहीस. मनाची जरा चिडचिड झाली. खूप काहीतरी तुला सांगायचं होतं. मनाचे काही विशिष्ट स्तर फक्त तुझ्याजवळच उलगडता येतात. तू थोड्या वेळाने उलट फोन केलास.

‘‘अगं, मी देवाजवळ बसले होते, म्हणून घेतला नाही तुझा फोन.’’

‘‘देवाजवळ...?’’ मला आश्चर्याचा धक्का!

‘‘हो, मी रोज संध्याकाळी एक तास देवाबरोबर असते. माझी ती वेळ ठरलेली आहे. त्यात मी कुठलीही तडजोड करणार नाही, हे आधीच घरी जाहीर करून टाकलंय.’’

वाक्यागणिक माझं आश्चर्य वाढत होतं. कॉर्पोरेट जगातली तू. दिसायला-वागायला-विचाराने आधुनिक. ही असली वाक्यं तुझ्याकडून मला कधी ऐकावी लागतील असं मला अजिबातच अपेक्षित नव्हतं.

तुझं विश्व घराची चौकट ओलांडून कधीच ग्लोबल झालं होतं. तुझं मन-तुझे विचार कधीच संकुचित नव्हते. कुठल्याही पद्धतीने तू पारंपरिक पठडीत बसणारी नव्हतीस. मग हे अचानक नवीन काय खूळ?

‘‘नवीनही नाही आणि खूळही नाही. खूप शांत वाटतं.’’ मी ऐकत होते. एकदा आपण दोघी गाडीतून चतु:श्रृंगीच्या देवळापुढून जाताना, तू चटकन त्या दिशेला वळून नमस्कार केलेला मला आठवला.

तेव्हा मी ते पाहून न पाहिल्यासारखं केलं होतं आणि माझ्या मनात तुझं ते ‘तसलं’ वागणं रजिस्टर करायचं नाकारलं होतं. पण आताचं तुझं बोलणं कसं नाकारणार मी?

‘‘देव आपल्याबरोबर कायम असला की एकटं वाटत नाही बघ, कधीही.’’

मी... बघू? मी देवाजवळ बसून बघू? मी स्वत:ला नास्तिक समजत नाही. पण आतापर्यंत कधी ‘देव’ या संकल्पनेचा फारसा विचारच केला नव्हता. ‘नंतर बघू’ या कॅटगरीतली ती संकल्पना होती. खूपशा गोष्टी ‘बघू, पुढे कधीतरी वेळ मिळाला की...’ अशा कप्प्यात आपण ढकलतो. त्यातलीच ती एक.

पण असा वेळ कधी मिळत असतो का? तो कायम कमीच पडतो. आधीच्याच कितीतरी गोष्टी करायच्या राहिल्या आहेत. अजून खूप पुस्तकं वाचायची राहिली आहेत. पेंटिंग करायचं आहे. सारं जग फिरायचं आहे. सिनेमे बघायचे आहेत... कितीतरी..!

‘‘देव कधी आपल्याशी प्रतारणा करणार नसतो, आपल्याला फसवणार नसतो. देवाला आपल्याबद्दल सगळं माहिती असतं, त्यामुळे त्याला काही सांगण्याचाही प्रश्न येत नाही.’’

तू बोलत होतीस, तसतशी ‘देव’ ही संकल्पना मला सोयीची वाटू लागली होती. माणसांच्या सहवासातल्या ताणतणावांपेक्षा देवाचा ‘सहवास’ बरा असणार. एकतर त्याला आपल्या चुका माहिती असतात. त्यामुळे आपणहून त्या कबूल करायचा प्रश्न नाही. तसा तो क्षमाशील असल्याचे ऐकिवात असल्याने, ती क्षमा करेल असं गृहीत धरायलाही हरकत नाही. बरं, तो स्वत: ‘देव’ असल्यामुळे तो कधी चुका करणार नसतो. आपल्याशी वाईट वागणार नसतो; म्हणजे माणसांसारखे त्याचे व आपले संबंध बिघडण्याचीही फारशी शक्यता नाही. बरंच आहे की गं!

‘नंतर बघू’च्या कप्प्यात ठेवल्या गेलेल्या देवाकडे पुन्हा डोकावून बघू या का; असं मला थोडं थोडं वाटू लागलं होतं.

‘‘खूप छान असते बघ समर्पणाची भावना.’ बापरे! आता हे काय नवीन? मी जरा कुठे देवाकडे डोकावायच्या मूडमध्ये आले होते..

‘Complete surrender! खरंच हलकं वाटतं.’

एकीकडे माझं स्वत:ला पडताळून बघणं सुरूच होतं. ‘संपूर्ण समर्पण Complete surrender’ ही संकल्पना पुन्हा मला एक धक्का देऊन गेली.

असं करता येतं? Complete surrender?


त्यासाठी काय करायला लागेल? देवापुढे कसं जावं लागेल? कसं जायचं असतं देवाला भेटायला? शरणागती पत्करायला जाणं म्हणजे आधी स्वत:चा 'अहं' बाजूला काढून ठेवावा लागेल. जमेल आपल्याला? मन कुठे असं स्वच्छ असतं आपलं? किती ओझी बाळगून असतो आपण. कुणाबद्दलचा राग, कुणाबद्दल तिटकारा, कुणाकुणाचा आपल्याबरोबर वाईट वागल्याचा चुकता करायचा राहिलेला हिशोब! अशा कितीतरी गोष्टी मनाच्या पोतडीत बाळगून असतो आपण. असल्या वाईटसाईट विचारांनी भरलेलं मन घेऊन देवाला सामोरं जाणार तरी कसं? – मग Complete surrender तर दूरची गोष्ट!

ती सगळी ओझी जरा बाजूला काढण्याचा विचार केला आणि लक्षात आलं, की आपल्याला ती बाजूला काढायची इच्छाच नाही. कुठेतरी आपल्याला ती ओझी हवी आहेत; कारण ती आपल्या 'अहं'साठी पोषक आहेत. आपण त्या सगळ्या विकारांना धरून राहू इच्छितो. ते आपल्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग आहेत. स्वत:बद्दलचे असे धक्कादायक निष्कर्ष समोर येऊ लागले. मला दचकायला झालं. देवापुढे बसलीस तू आणि मला का म्हणून त्रास?

मला नाही जमणार एवढं नमतं घ्यायला. मला अजून जग जिंकायचं आहे. लोकांना अद्दल घडवायची आहे. मला माहिती आहे, हा सगळा माझ्या 'अहं'चाच भाग आहे. ते तुझं Complete surrender का काय ते, तूच कर. माझ्या मनाची अजून तरी तेवढी तयारी नाही. 'अहं' बाजूला ठेवण्यापेक्षा सध्या तरी मी देवाला 'नंतर बघू'च्या कप्प्यात ढकलते. सवड झाली की पुढे बघू.

**– डॉ. माधवी मेहेंदळे**
प्रकाश आय हॉस्पिटल,
७५९/७५/३, डेक्कन जिमखाना,
कॅफे गुडलकमागे,
पुणे–४११००४
दूरध्वनी : २५६७७७५५
भ्रमणध्वनी : ९८९०९०४१२३
madhavimehendale@gmail.com

**ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्रामार्फत नुकताच प्रसिद्ध झालेला कवितासंग्रह**




**प्रकाशनसमयी – तानुबाई नवले, आशालता कांबळे, अंनतराव उपशाम, प्रा. भगवान भोईर, उर्मिला पवार, प्रतिमा जोशी, कवयित्री शारदा नवले, सुरेश केदारे**




## वर्तुळ पुसून टाकताना...

**शारदा नवले**

**मूल्य ८० रुपये**
**सवलतीत ४५ रुपये**

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

Centralites for Customers

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
Central Bank of India
1911 पासून आपल्यासाठी "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

आयएसओ 27001:2005 प्रमाणित



सेन्ट सुपर+

555 दिवसांच्या ठेवीवर

आता मिळवा अधिक

सामान्य जनतेसाठी 9.30% प्रतिवर्ष व्याज

वरिष्ठ नागरिकांसाठी 9.80% प्रतिवर्ष व्याज

*अटि लागू

अधिक माहितीसाठी कृपया www.centralbankofindia.co.in वर लॉग ऑन करा
किंवा कस्टमर केअर नं.: 1800 200 1911 वर कॉल करा (टोल फ्री)

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.